मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १९६ ■ शुक्रवार, २७ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## थोडक्यात

### १० वर्षीय मुलाला मारण्याची धमकी ; चिट्ठीतून खंडणीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने दहा वर्षीय मुलाच्या जिवाला धोका असल्याची धमकी देत चिठ्ठीत, टाकून पैसे आणि सोन्याच्या स्वरुपात खंडणी मागितल्याची धक्कादायक घटना तळोजा फेज-१ परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात उबेर लयीक शेख (रा. तळोजा फेज-१) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.तळोजा फेज-१ येथे राहणारे मोहम्मद राशिद अशपाक खान यांना त्यांच्या पत्नीचा फोन आला. त्यांच्या नावाने आलेल्या संशयास्पद चिठ्ठीची माहिती त्यांनी दिली. घरी आल्यानंतर खान यांनी ती चिठ्ठी पाहिली असता, त्यांचा दहा वर्षीय मुलगा राहील याच्या जिवाचे बरे-वाईट करण्याची धमकी देण्यात आली होती. तसेच पैसे आणि सोन्याच्या स्वरुपात खंडणीची मागणी केली होती. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन खान यांनी इमारतीतील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये शेजारी राहणारा उबेर शेख हा पांढऱ्या लिफाफ्यातील चिठ्ठी घरात टाकताना स्पष्टपणे दिसून आला. याप्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे.

### सायबर चोरट्याचा दोघांना लाखोंचा गंड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** गॅस बिल अपडेट करण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी कामोठे येथे राहणाऱ्या दोघांना तब्बल ४ लाख ४६ हजारांना लुबाडल्याचे उघडकीस आले आहे.या दोन्ही घटना कामोठे परिसरात घडल्या आहेत.पहिल्या घटनेत सायबर चोरट्याने एक लिंक पाठवून कामोठे सेक्टर-१८ मधील श्री गणेश सोसायटीत राहणारे आशुतोष पाटील यांच्या खात्यातून २ लाख २ हजार रुपये तर ओमशिवम रेसिडेन्सीमध्ये राहणारे पवन सिंग हीच लिक पाठवून त्यांच्या खात्यांतून गुगल पे व फोन पेद्वारे एकूण २ लाख ४४ हजार रुपये काढून त्यांची फसवणूक केली.

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** तळोजा एमआयडीसी परिसरातील पेंधर फाट्याजवळील नावडा सर्व्हिस स्टेशन येथे एका भरधाव ट्रकने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात २८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. राजूसिंग रजपूत असे या तरुणाचे नाव असून, हा अपघात घडल्यानंतर ट्रक चालक वाहन सोडून घटनास्थळावरून पसार झाला. राजूसिंग व मुकेशकुमार चौधरी हे दोघे घोट गाव येथे राहतात. ते तळोजा एमआयडीसीतील ध्रुव लॉजिस्टिक्समध्ये कामाला होते. हे दोघे दुचाकीने कल्याण-पनवेल रोडने घरी जात असताना हा अपघात झाला.

# सुजलाम सुफलाम सावनेरच्या विकासाच्या दिशेने दमदार सुरुवात – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ३१ कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन

**नागपूर :** सावनेरच्या मुख्य रस्त्याचे सौंदर्यीकरण व मौनीबाबा आश्रमाचे भूमिपूजन आज झाले. खत आणि कोल गॅसिफिकेशन असे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार आहेत यातून 40 हजारावर रोजगार निर्मिती होणार आहे. या सर्व प्रकल्पांमधून सुजलाम- सुफलाम सावनेर होण्याच्या दिशेने सुरुवात झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

जगात युद्धाची परिस्थिती असताना भारत विश्वशांतीच्या दिशेने विचार करतो आणि विश्वशांतीसाठी विश्व महाआरतीचे सावनेर मध्ये झालेले आयोजन भूषणावह असल्याच्या भावना व्यक्त करून महाआरतीच्या गिनिज बुक ऑफ रेकॉर्डसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

श्री रामनवमीच्या पवित्र पर्वावर सावनेर नगरपरिषद मैदानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती विश्वविक्रमी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच विकास कामांचे ऑनलाईन भूमिपूजनही त्यांचा हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्य मंत्री ॲड आशिष जयस्वाल,आमदार डॉ. आशिष देशमुख ,माजी मंत्री रणजित देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रभु राम हे आपले आदर्श आहेत. समाजात कोणी लहान मोठे नसून सर्व समान असल्याची शिकवण देऊन त्यांनी युगधर्म मांडला. त्याच प्रभु रामांच्या जन्मदिनी रामनवमीला सावनेरचा मुख्य रस्ता सौंदर्यीकरण प्रकल्प आणि रघवी समाजाचे थोर संत मौनीबाबा यांच्या आश्रमाचे बांधकाम व सौंदर्यीकरण कामाचे भूमिपूजन झाले. सावनेर मतदार संघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी या भागात कोल गॅसीफिकेशन प्रकल्प आणि खत प्रकल्पसाठी केंद्र व राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा केला. येत्या काळात हे दोन मोठे प्रकल्प या भागात उभे राहणार असून याद्वारे जवळपास 40 हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या सर्व कामांद्वारे या भागाच्या विकासाला चालना मिळेल व हा भाग सुजलाम-सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय रस्ते निधीच्या 26 कोटी रुपयातून सावनेर मुख्य रस्ता सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे तर 5 कोटी खर्चातून मौनीबाबा आश्रम उभारणी व सौंदर्यीकरण होणार आहे.तत्पूर्वी ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूल मंत्री तथा पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांच्यासह 4911 भक्तांनी गणपतीची महाआरती केली. याच कार्यक्रमात गिनीज बुक ऑफ रेकॉर्डच्या भारतातील अधिकाऱ्याने या महाआरतीचा हा गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. आमदार डॉ आशिष देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

# चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल मध्ये छंदवर्ग

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल मध्ये फॅब्रिक पेटिंगच्या छंद वर्गाचे आयोजन केले होते. गिरगावातील, चिकित्सक समूह शाळेच्या माजी विद्यार्थिनी सौ. संचिता सचिन सुर्वे यांनी विद्यार्थ्यांना फॅब्रिक पेंटीग शिकविले आणि प्रात्यक्षिकही करून दाखिवले. सर्व मुलांनी या छंद वर्गाचा मनमुराद आनंद लुटला, तसेच बऱ्याच मुला-मुलींनी अप्रतिम कलाकृती सादर केल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका. श्रीमती संचिता गावड़े आणि पोतदार प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मर्दे यानी त्याचे अभिनंदन केले.

दिपिका यांनी बॅग बनविण्यास 2021 पासून सुरवात केली. पार्ट टाइम जॉब करून त्या बॅग्स पेंटिंगचा व्यवसाय करतात. तसेच महाराष्ट्र व्यापार पेठ, ब्राम्हण सभा, ठाणे शाखा आणि वेगवेगळया ठिकाणी त्या प्रदर्शन भरवित असतात त्यास ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सुरुवातीला फक्त ५० बॅग आणि शंभर पाऊची सुरवात करून त्याचे रूपांतर 5000 बॅग्स वर झालेले आहे. वेगवेगळया प्रकारच्या बॅग्स बनवून घेऊन त्याच्यावर पेंटिंग करून देतात. बॅगेंची रंग



संगती आणि त्यांचा दर्जा असल्यामुळे त्यांच्या बॅग्सना परदेशातही मागणी आहे. त्यांच्या छंदाचे रूपांतर व्यवसायात झाले आहे.

विदयार्थिनीनी सुद्धा कला जोपासावी हा संदेश त्यांनी दिला.. आपली कला सर्वांपर्यंत पोहोचावी हेच त्यांचे ध्येय आहे. या कार्यक्रमामध्ये शिशु वर्गाच्या मुख्याध्यापिका श्रीमती आरती पेवेकर, तसेच शाळेतील शिक्षिका श्रीमती शारदा वायाळ, श्रीमती ममता सोनावणे, श्रीमती संध्या कांबळे, श्रीमती सीमा शिलेदार, श्रीमती विशाखा विधाटे ,श्रीमती वनिता आजगेकर यांनी सहभाग घेतला होता.

# ‘ओव्हरआर्म’ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन; खुटील येथे रंगणार क्रिकेटचा महासंग्राम

## " जय हनुमान चषक 2026 चा मानकरी कोण..? "

**दैनिक युवक आधार**

**मुंबई | सुजित धाडवे :** महाड तालुक्यातील खुटील हनुमान वाडी (होडबेकोंड ) येथे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त ओव्हरआर्म’ क्रिकेट स्पर्धेचा थरार रंगणार आहे." विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या जय हनुमान प्रतिष्ठान क्रिकेट संघ यांच्या पुढाकाराने तसेच जय हनुमान मित्र मंडळ मुंबई पुणे ठाणे ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ खुटील हनुमानवाडी (होडबेकोंड )यांच्या सहकार्याने गेली चार वर्ष सातत्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा स्पर्धेचे पाचवे वर्ष असून 5 एप्रिल 2026 रोजी खुटील हनुमानवाडी (होडबेकोंड ) धरणाजवळ ही स्पर्धा पार पडणार आहे. क्रिकेट रसिकांना ही स्पर्धा थेट यूट्यूब लाईव्ह स्वरूपात पाहता येणार असल्याचे जय हनुमान प्रतिष्ठान चे कर्णधार समीर गायकवाड यांनी सांगितले.

एक गाव एक संघ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या ही स्पर्धा तालुका महाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशन अंतर्गत असोसिएशनच्या नोंदनीकृत २४ संघांदरम्यान खेळवली जाणार आहे.




परिसरातील क्रिडाप्रेमींसाठी ही स्पर्धा मोठी पर्वणी ठरणार असून दिवसभर क्रिकेटप्रेमींची उस्फुर्त उपस्थिती अपेक्षित आहे. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या विजेत्या संघाना आकर्षक चषक पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांनाही विशेष चषक देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांना MAT कोर्टाचा दणका

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाकड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांची केवळ 8 महिन्यांत अचानक बदली करण्यात आल्याने प्रशासकीय वाद निर्माण झाला आहे. त्यांच्या विरोधात कोणतीही कायदा व सुव्यवस्था संबंधित तक्रार, जनतेचे अर्ज किंवा राजकीय तक्रार नसताना ही बदली करण्यात आली याबाबत सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे

विशेष म्हणजे, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांनी सर्वसाधारण बदल्या होईपर्यंत इतर कोणत्याही बदल्या करू नयेत असा लेखी आदेश दिला असतानाही पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी ही बदली केल्याचा आरोप मा मॅट कोर्टात करण्यात आला आहे.या अन्यायकारक बदलीविरोधात वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT), मुंबई येथे दाद मागितली.

दि. 24 मार्च 2026 रोजी झालेल्या सुनावणीत माननीय न्यायाधीश चक्रवर्ती यांनी पोलीस आयुक्तांकडे माळी यांच्या बदलीचे कारण विचारले. मात्र, त्यांच्या विरोधातील कोणतीही तक्रार किंवा कसूर दर्शवणारी कागदपत्रे सादर करण्यात आयुक्तालय अपयशी ठरले. यावर न्यायालयाने नाराजी व्यक्त करत दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असून 7 एप्रिल 2026 ही पुढील सुनावणीची तारीख निश्चित करण्यात आली आहे.

तसेच, सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया, बॉम्बे हायकोर्ट, MAT आणि पोलीस महासंचालक यांच्या आदेशांकडे दुर्लक्ष करून पिंपरी-चिंचवड आयुक्तालयात मुदत पूर्ण होण्यापूर्वीच मोठ्या प्रमाणात बदल्या करण्यात आल्याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. माहितीनुसार, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांचा कार्यकाळ 2024 मध्ये पूर्ण झाला असून, बदलीची शक्यता लक्षात घेता त्यांनी सुमारे 50 वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक यांच्या संशयास्पद बदल्या केल्याचा आरोप सर्वत्र होत आहे. याबाबतही न्यायालयाने माहिती सविस्तर मागवली आहे. ती माहिती प्राप्त करण्याकरिता ॲड प्रशांत नागरजोगे यांनी मा पोलीस आयुक्त यांचेशी पत्रव्यवहार केला असुन आयुक्तलायाचे अडचणीत वाढ झाली आहेमा कोर्ट ने हे प्रकरण अत्यंत गंभीर मानले जात असून, 2024 मध्ये मुदत पूर्ण झाल्यानंतरही आयुक्तांची बदली न होणे आणि इतर अधिकाऱ्यांच्या मुदतीपूर्वी बदल्या करणे यावर मा कोर्टात प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकरणात शत्रुघ्न माळी यांच्या वतीने ॲड. प्रशांत नागरजोगे कामकाज पाहत आहेत.

दि. 7 एप्रिल 2026 रोजी MAT कोर्ट काय निर्णय देते याकडे संपूर्ण महाराष्ट्र पोलीस दलाचे लक्ष लागले आहे. प्रसिध्दी -ॲड प्रशांत नागरजोगे +91 93263 33302

# राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला द्वितीय पारितोषिक

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी/विलास गायकवाड :** भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन व राजस्थान टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ९वी सिनियर राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा जयपूर येथील श्री बालाजी क्रिकेट मैदान, जयपूर, राजस्थान येथे उत्साह संपन्न झाली त्यामध्ये प्रथम क्रमांक उत्तर प्रदेश(यु.पी)

द्वितीय क्रमांक महाराष्ट्र,तृतीय क्रमांक झारखंड चतुर्थ क्रमांक राजस्थान यांनी मिळवला. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट फेडरेशनचे अध्यक्ष कन्हैया गुज्जर तसेच भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ मीनाक्षी गिरी ,महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महिला अध्यक्ष धनश्री गिरी, इत्यादी उपस्थित होते. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये एकूण 12 संघांनी सहभाग नोंदवला टेनिस क्रिकेट स्पर्धेचा अंतिम



सामना महाराष्ट्र विरुद्ध उत्तर प्रदेश(यूपी) असा झाला. यामध्ये उत्तर प्रदेश(यूपी) च्या खेळाडूंनी लक्षवेधक कामगिरी करत विजेतेपद मिळवले. महाराष्ट्र संघाने चांगले प्रयत्न करून या अंतिम सामन्यात चांगली चुरस निर्माण करून उपविजेता ठरला तृतीय क्रमांक झारखंड ,चतुर्थ क्रमांक राजस्थानला मिळाला. महाराष्ट्र संघाकडून कप्तान दर्शन थोरात, मानस पाटील ,देवा सोनवणे ,नारायण जंगम ,साहिल शिरसाट ,डॉ. गजानन जाधव (वैद्यकीय अधिकारी) ,कुणाल जाधव (आरोग्य सेवक) ,अंकुर हुमरे अन्वर पठाण ,अभय चव्हाण ,विकास मस्के (शिक्षक) ,सोमा बिरादार ,इंद्रजीत कांबळे ,शुभम जंगम ,संकेत डोंगरे ,सत्यम पांडे यांनी चांगली कामगिरी केली व महाराष्ट्र संघाला उपविजेतेपद मिळालेया स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू याची आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे या स्पर्धेतून ज्या खेळाडूंची निवड होणार आहे ते खेळाडू भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे . आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धा या डिसेंबर महिन्यामध्ये नेपाळ येथे होणार आहे .महाराष्ट्र संघाला उपविजयतेपद मिळाल्याबद्दल आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट फेडरेशनचे अध्यक्ष कन्हैया गुज्जर व भारतीय व महाराष्ट्र टेनिस क्रिकेटच्या महासचिव मीनाक्षी गिरी, वूमन डायरेक्टर धनश्री गिरी, महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी ,चंद्रकांत तोरणे महाराष्ट्र सहसचिव, व नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड या सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच संघाच्या विजयासाठी मार्गदर्शक म्हणून धनंजय लोखंडे ,संदीप पाटील या सर्वांनी परिश्रम घेतले.

# उरण तालुक्यातील नवघर गावात श्री राम नवमी मोठ्या उत्साहात सपंन्न !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** सालाबाद प्रमाणे आज गुरूवार दिनांक २६/०३/२०२६ रोजी उरण तालुक्यातील नवघर गावातील श्री हनुमान मंदिरात श्री राम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला असून सकाळी ५ -०० वाजता मंदिरातील स्थापन करण्यात आलेल्या सर्व देवतांचे मंगळस्नान करून अभिषेक श्री विजय पुरोषत्तम तांडेल यांच्या हस्ते करून झाल्या नंतर सकाळी ठिक १०-०० वाजता रायगड भुषण ह.भ.प.प्रभाकर महाराज तांडेल यांचे श्री राम जन्मावर सुश्राव्य असे किर्तन झाले असता नवघर तसेच नवघर परिसरातील श्री रामभक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत राहून रामजन्मोत्सव



राजरा करण्यात आला असता नवघर गावासह आजूबाजूच्या गावातील श्री रामभक्तांची मंदिरात दर्शनासाठी रांगा लावून मनोभावे दर्शन घेतले. तसेच सालाबाद प्रमाणे महाप्रसादाचे आयोजन कै.पुरूषोत्तम रामदास तांडेल यांच्या सर्व मुलांच्या वतीने करण्यात आले असता गावातील ग्रामस्थांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# केळवणे गावात रामनवमी जन्मोत्सव उत्साहात साजरा !!


**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी. भोईर :** हिंदू धर्माच्या अस्मितेचे प्रतीक श्री विष्णूचे त्रेतायुगातील सातवे अवतार मर्यादा पुरूष श्री रामाचा जन्म दिवस मोठ्या हर्ष जल्लोषात व भक्ती भावनेने देशभरात साजरा केला जातोय ,त्यामुळे रामांच्या कथांना अपरिचित असा कोणीच माणूस नसेल. अयोध्या नगरीचा रघुवंशी राजा दशरथ याला कौसल्या ,सुमित्रा व कैकयी अशा तीन राण्या पण मुलबाळं नव्हते म्हणून राजगुरूंच्या मार्गदर्शनात त्याने पुत्रकामेष्टी यज्ञ केला व त्या यज्ञाच्या प्रसाद भक्षणाने तीनही राण्याना उचित वेळी कौसल्येला राम,सुमित्रेला लक्ष्मण तथा कैकयीला जुळी मुले भरत व शत्रूघ्न अशी एकूण चार पुत्ररत्ने झाली .श्रीराम एक आदर्श पुत्र-पति-बंधू, स्वामी, धर्मरक्षक आणि कर्तव्यदक्ष, प्रजा पालक. श्रीराम हे पितृवचन पालक, मातृभक्त, एकवचनी आणि



आदर्श असं व्यक्तिमत्व होय. श्रीरामांनी बालपणीच आपल्या गुरुंच्या यज्ञांचे, धर्माचे संरक्षण केले. दुष्ट राक्षसांचा संहार केला. अहिल्येचा उद्धार करून त्यांनी पतित पावन हे विशेषण खरं केलं. राजाजनकाच्या मिथिलानगरीत जाऊन शिव धनुष्याचा भंग केला. भुमीकन्या सीतेबरोबर विवाह केला. श्रीराम हे अयोध्येचे राजपद भुषवणार म्हणून सारी प्रजा आनंदांत असतानाच मातृ-पितृ आज्ञेचं पालन करीत त्यांनी चौदा वर्षाचा वनवास स्वीकारला. सीता हरणाच्या निमित्त्याने लंकाधिपती रावण आणि त्याची राक्षस सेना ह्यांचा वध केला.

मर्यादा पुरूषोत्तम हे श्रीरामांचे आणखी एक वैशिष्ट्य. श्रीरामाचे जीवन, त्यांची कर्तव्य निष्ठा, संयम, शौर्य, औदार्य हे सारं सारंच कसं अगदी वंदनीय आणि आचरणीय.आदर्श देवाताची आपल्याला सदैव आठवण रहावी तो आदर्श आणि ते गुण आपण काही अंशी तरी आपल्यात उतरावेत म्हणून हे रामजन्माचे निमित्य म्हणजेच *रामनवमी* . राम जन्माच्या दिवशी मठ-मंदिरात भजन, पूजन, किर्तन, प्रवचन इ. कार्यक्रम करून हा जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. ह्या काळांत रामायण ग्रंथाचे वाचन, रामकथेचे निवेदन, गीत रामायणाचे गायन इ. कार्यक्रम ही केले जातात. मध्यान्ह काळी म्हणजे दुपारी बारा वाजता रामजन्माचा पाळणा म्हणून हा राम जन्मोत्सव केला जातो.व प्रसाद म्हणून सुंठवडा वाटला जातो.केळवणे गावातही रामनवमी जन्मोत्सव मोठ्या भक्ती भावनेने व हर्ष जल्लोषात पालखी मिरवणूक करून दरवर्षी साजरी केली जाते, भाविक भक्त व गावकरी मोठ्या भक्ती भावाने व श्रद्धेने *राम नवमी* साजरी करतात. सकाळी मूर्ती अभिषेक व जन्मोत्सव कार्यक्रम यथायोग्य, शिस्तबद्ध आणि पारंपारिक रितीने पार पाडण्यात येते ,या वेळी कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची खबरदारी कमेटी व ग्रामस्थ घेते.या मंदिराची निर्मिती १९६२ साली झाली,बामा हाश्या ठाकुर ,चांगा जानु घरत,महादेव जानु म्हात्रे ,महादेव आंधळा कोळी ,नामदेव बुध्या माळी ,बाळू राघो ठाकुर ,नागा रामा पाटील ,चांगा बुध्या पाटील ,पांडुरंग सिना ठाकुर व नंतर इतर सभासद मिळून ६९ जनांचा समावेश झाला , या सर्वांनी मिळून गावात श्रीरामाचे छोटेसे कौलारू मंदिर बांधले पस्तीस वर्षापूर्वी या मंदिराचा जिर्नोद्वार झाला होता पण आता ६४ वर्षानंतर नव्या तरूण वर्गाने व नव्या सभासदांनी या मंदिराचे भव्यदिव्य व विलोभनिय स्वरूपात रूपांतर केले आहे .

# पनवेलमध्ये ४ एप्रिल रोजी ‘खुशरंग’ संगीत महोत्सव; दिग्गज कलाकारांची उपस्थिती






**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल आणि नादब्रह्म साधना मंडळ, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ०४ एप्रिल रोजी पनवेलमध्ये भव्य ‘खुशरंग’ संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संगीत रसिकांसाठी ही एक पर्वणी ठरणार असून, शास्त्रीय संगीत, भजन आणि कथक नृत्याचा संगम या महोत्सवात अनुभवायला मिळणार आहे.

शहरातील मार्केट यार्ड परिसरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सायंकाळी रंगणाऱ्या या महोत्सवात संगीत क्षेत्रातील अनेक नामवंत आणि अनुभवी कलाकार आपली कला सादर करणार आहेत. या महोत्सवात किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पंडित फिरोज दस्तुर यांचे शिष्य पं. गिरीश संजगिरी, पं. पी.व्हि. कडलास्कर व पं. शंकर अभ्यंकर यांचे शिष्य पं. महेश कुलकर्णी यांचे गायन, त्यांनतर विनायक ललित व तनुश्री जोग यांचे गायन, पं. भाई गायतोंडे यांचे शिष्य पं. विनायक नाईक यांच्या संकल्पनेतून साकारलेला कथक नृत्य कलाविष्कार कार्यक्रम डॉ. वैशाली दुधे यांच्या शिष्या आर्या महाजन व ऋतुजा कुलकर्णी सादर करतील. समारोप उस्ताद अस्लम खान(खुशरंग), उस्ताद अजीम खान, भजनसम्राट ह.भ.प.निवृत्तीबुवा चौधरी व पंडिता शुभदाताई पराडकर यांचे शिष्य पं. उमेश चौधरी यांच्या गायनाने होणार आहे. सदर कलाकारांना संवादिनी संगत विनायक ललित व स्मिता मनोहर; तबला साथ पं. महेश कान्होले, प्रसाद सुतार, विनायक नाईक, भक्ती जाधव, सुधिंद्र बागल; पखवाज साथ सोमदत्त माने; सहवाद्य साथ जगदिश म्हात्रे तर निवेदन सोपान आढाव करणार आहेत. या महोत्सवाचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वसंतशेठ पाटील, विनोद तोडेकर, अक्षय चौधरी, अनिल कोळी यांनी केले आहे.

# प्राचार्य कैलास आण्णा गवळी यांची राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कारासाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** उगाव तालुका निफाड येथील भूमिपुत्र तसेच *महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय उगाव येथील विद्यालयाचे आदर्श प्राचार्य कैलास आण्णा गवळी* यांच्या आदर्श शैक्षणिक प्रशासन व अल्पावधीतच विद्यालयाला नावलौकीन मिळवून देणारे व सातत्याने शैक्षणिक क्षेत्रात विद्यालयाला उंचीवर नेऊन ठेवणारे आदर्श प्रशासक या सर्व बाबींचा विचार करता त्यांना *आश्रय आशा फाउंडेशन तालुका मालेगाव* यांच्या वतीने आयोजित *राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार* सोहळ्यासाठी निवड करण्यात आली आहे



मालेगाव येथील आश्रय आशा फाउंडेशन व्हाणे यांच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार सन्मान 2026 या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व लोकसेवेचे कार्य करणाऱ्या मान्यवर पुरस्कारार्थींची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून राज्यातील विविध जिल्ह्यांमधून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा व कार्याचा सखोल आढावा घेऊन निवड समितीने समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तीची निवड केली आहे या राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार सोहळ्यासाठी प्राचार्य कैलास अण्णा गवळी यांच्या कार्याची दखल घेत आश्रया आशा फाउंडेशनच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे अशी माहिती पुरस्कार सोहळ्याचे मुख्य आयोजक *राजेंद्र राऊत पाटील* व पुरस्कार सोहळा समितीचे प्रसिद्धी प्रमुख *रामभाऊ आवारे सर* यांनी दिली आहे. पुरस्कार वितरण सोहळा *शनिवार 25 एप्रिल 2026 रोजी सकाळी दहा वाजता हरिकेश लॉन्स बॅक्वेट हॉल दाभाडी रोड दौलती शाळेजवळ मालेगाव कॅम्प* जिल्हा नाशिक येथे नामावंत मान्यवरांच्या हस्ते *ट्रॉफी, सन्मानपत्र, कोल्हापुरी फेटा, शाल, युवा मराठा महासंघाचे दैनिक दिनदर्शिका कॅलेंडर, 28 पानांचा पुरस्कार, विशेषांक गुलापुष्प* देऊन सन्मानित केले जाणार आहे.

प्राचार्य *श्री कैलास गवळी* यांची राज्यस्तरीय शिवछत्रपती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष *श्री गुलाबराव जोंधळे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री दीपक भाऊ जोंधळे सचिव श्री दत्ताभाऊ जोंधळे विनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री मधुकर आप्पा पाटील उपाध्यक्ष श्री साहेबराव आबा पानगव्हाणे* विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उगाव ,शिवडी , हिंगलाज नगरचे सर्व पालक,विद्यार्थी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# भारतीय स्टेट बँक, हाशिवरे शाखेकडून महात्मा गांधी विद्यालयातील ५० गरजू मुलींना मोफत सायकलींचे वितरण

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी. भोईर :** मंगळवार दिनांक २४ मार्च २०२६ रोजी पेण येथील हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते नववी मधील ५० गरजू मुलींना भारतीय स्टेट बँक(SBI)हाशिवरे सी.एस.आर. फंडातून सायकलींचे वितरण करण्यात आले. शाळा ग्रामीण भागातील असल्यामुळे मुलींना शाळेत येण्यासाठी आदर्श पर्यावरण वाहन सायकलचे वितरण *"बेटी बचाओ, बेटी पढाओ"* हा उपक्रम राबवण्यात आला. मुलींना सायकल मिळाल्यावर मुलींच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता. या कार्यक्रमासाठी भारतीय स्टेट बँकेचे माननीय श्री विलास शिंदे




साहेब (रिजनल मॅनेजर, पेण रायगड विभाग),माननीय श्री स्वप्निल तांबोळी साहेब (चीफ मॅनेजर क्रेडिट डिपार्टमेंट पेण, रायगड विभाग), माननीय श्री ज्ञानेश्वर जरारे साहेब (एफ. आय .डिपार्टमेंट पेण, रायगड विभाग) तसेच मा. श्री रविंद्र चिंधे साहेब (शाखा व्यवस्थापक SBI हाशिवरे) , श्री आदित्य म्हात्रे, श्री चिराग म्हात्रे बँकेचे कर्मचारी हे उपस्थित होते. तसेच हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या उपाध्यक्षा श्रीमती सरोज डाकी मॅडम, मंडळाचे सल्लागार श्री सुबोध मोकल साहेब, कार्यकारणी सदस्य श्री निशिकांतजी मोकल साहेब, मुख्याध्यापक श्री बी. डी. गायकवाड सर ,पर्यवेक्षक श्री प्रबळकर सर, सर्व शिक्षक, व सर्व मुलींचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेचे सर्व पदाधिकारी यांचा परिचय व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बी जी.शिकारे सर यांनी केले. इयत्ता आठवी अ मधील कुमारी श्रेया, प्राची, नेहा यांनी स्वागतगीत सादर केले.

माननीय मुख्याध्यापक श्री बी.डी गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शिकारे सर व श्री आंधळे सर यांनी या उपक्रमासाठी पाठपुरावा केला.

# विजय आर्मी स्कूलमध्ये वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश सुरू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल:** चिखले ता. पनवेल येथील विजय आर्मी स्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश सुरू झाले आहेत. विजय आर्मी स्कूल ही सैनिकी शाळा असून फक्त मुलांसाठी आहे. महाराष्ट्र स्टेट अभ्यासक्रम असून शिकवण्याचे माध्यम सेमी इंग्लिश असेल. ही शाळा निवासी सैनिकी स्कूल असून अनिवासी विद्यार्थ्यांसाठीही प्रवेशाची सोय आहे.

इयत्ता सहावीसाठी प्रवेश सुरू झाले आहेत आणि खुल्या आणि ओबीसी संवर्गासाठी इयत्ता सातवी ते दहावी काही रिक्त जागांसाठी काही प्रवेश शिल्लक आहेत. तसेच इयत्ता अकरावी आणि बारावीसाठी विज्ञान शाखेसाठीही ऑफलाईन प्रवेश नोंद प्रक्रिया सुरू झाली आहे. शाळेत मुलांसाठी स्वतंत्र खोल्या, आधुनिक



सोयी आणि सुविधा उपलब्ध आहेत. इयत्ता सहावी आणि सातवीसाठी निवडपूर्व प्रवेश परीक्षा ५ एप्रिल २०२६ रविवारी सकाळी १० वाजता विजय आर्मी स्कूल चिखले येथेच होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

संपर्क: ९७३०६८३७४८, ९३५९२६०३३७, ९८६७१२१९६२.

शाळेतील प्रवेशाबाबत अधिक माहिती आणि मार्गदर्शनासाठी शाळेचे कमांडंट पी व्ही आर क्रिष्णन यांना भेटावे.प्रवेश नोंदणीसाठी खालील लिंकवर क्लिक करावे.

# उमरी येथे श्रीसिताराम मंदिर श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार :**
**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी येथील जुन्या गांवा भागातील श्रीसिताराम मंदिर येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीरामला जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीसिताराम मंदिर येथे विधीवत प्रार्थसमयी श्रीरामललास दुग्धअभिषेक मंदिराचे पुजारी श्री. गणेश महाराज यांच्या वतीने करण्यात आले श्री. संतोष चाटोरीकर महाराज यांच्या वतीने रामलला जन्मोत्सव कथा सांगण्यात आली. दुपारी बारा वाजता श्रीरामलला पाळणा म्हणत महाआरती करण्यात आली. तदनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी उमरी शहर व तालुकातील, पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या प्रमाणात




श्रीरामललाचे दर्शन व महाप्रसाद घेतला.

# चक्रवर्ती सम्राट अशोक जयंती 2026 भव्य उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-प्रकाश गवारे :** भारतीय बौद्ध महासभा पुरुष व महिला जिल्हा शाखा नांदेड (उत्तर), नांदेड उत्तर शहर शाखा, तालुका शाखा तसेच समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 26 मार्च 2026 रोजी गुरुवारी सकाळी 10.00 वाजता नालंदा बुद्ध विहार, श्रद्धास्थळ भीमघाट येथे चक्रवर्ती सम्राट अशोक यांची 2330 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा नांदेड (उत्तर) चे जिल्हाध्यक्ष आदरणीय गणपत गायकवाड होते. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा सरचिटणीस




आदरणीय दामोदर सरकटे, सा. ना. भालेराव, नागराज कांबळे, सुरेश लोकडे, सुरेश गजभारे, कृष्णा गजभारे, रामराव कदम, आनंद जोंधळे, सदाशिव हनुमंते, सुरेश हटकर, जनार्दन जमदाडे, केशव वाघमारे, साहेबराव वाघमारे तसेच सुभाष लोखंडे यांच्यासह अनेक मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या महान कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या धम्मनीती, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रभावीपणे प्रचार-प्रसार करण्यात आला. उपस्थितांना बौद्ध धम्माच्या तत्त्वांची सखोल माहिती देण्यात आली.कार्यक्रमास जिल्हा महिला शाखा (उत्तर), नांदेड उत्तर शहर शाखा, तालुका शाखा तसेच भारतीय बौद्ध महासभा नांदेड (उत्तर) चे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सा. ना. भालेराव यांनी केले, तर आभार प्रदर्शन आदरणीय सुरेश रोकडे यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# श्रीवर्धन : जीवना बंदर येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यातील जीवना बंदर येथील श्री राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सप्ताहामुळे संपूर्ण परिसर गेल्या ८ ते १० दिवसांपासून भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

दररोज हरिनामाच्या गजरात आणि अभंग-कीर्तनांच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळत होती. कीर्तन सप्ताहात विविध कीर्तनकारांनी श्रीरामांच्या चरित्राचे सुंदर वर्णन



करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

आज राम जन्मोत्सवानिमित्त मंदिरात विशेष पूजा, आरती आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर श्रीरामांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. टाळ मृदुंगाच्या गजरात, "जय श्रीराम" च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या धार्मिक सोहळ्यामुळे जीवना बंदर परिसरात भक्तीमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांनी मोठ्या श्रद्धेने व आनंदाने या उत्सवात सहभाग घेतला.

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे समाजकार्य क्षेत्रात नवसंजीवनी; रोजगाराच्या नव्या दालनांची उघडझाप!"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे नोकऱ्या कमी होतील, अशी भीती व्यक्त केली जात असली तरी प्रत्यक्षात समाजकार्य क्षेत्रासाठी ही मोठी संधी ठरणार आहे. समाजातील बदलत्या गरजांनुसार नवे रोजगार, नवे प्रकल्प आणि नवे उपक्रम उभे राहतील, असा ठाम विश्वास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. भालचंद्र देशमुख यांनी व्यक्त केला.

श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम येथे विद्यार्थी विकास विभाग,




सांस्कृतिक विभाग व परीक्षा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदवी वितरण (दीक्षांत) समारंभात प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाला श्री सरस्वती प्रगत विद्या प्रसारक मंडळाचे सचिव राहुलभाऊ कोठारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

समारंभाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली.

यावेळी पदवी, पदव्युत्तर तसेच आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. वातावरणात आनंद, अभिमान आणि उत्साहाचे स्वर उमटत होते.

यावेळी समाजकार्य अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. संदीप शिंदे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी समाजकार्याच्या ज्ञानाचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. "समस्यांकडे संधी म्हणून पाहा आणि स्वतःला सक्षम बनवा," असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विभागप्रमुख डॉ. भदरगे सर यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणातून मिळवलेले ज्ञान केवळ प्रमाणपत्रापुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष जीवनात वापरण्याची अपेक्षा व्यक्त केली.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी असलेले प्राचार्य डॉ. अतुलकुमार राऊत यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करताना, "विद्यार्थ्यांनी स्वतःचा, कुटुंबाचा, गावाचा आणि महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावावा," असे आवाहन केले.

कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी गोपाल भिसडे यांनी मनोगत व्यक्त केले, तर कु. ऋतुजा भोयर हिने सादर केलेल्या कवितेने उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन प्रा. उद्धव बनकर यांनी केले. राष्ट्रगीताने समारंभाची सांगता झाली.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजकार्य यांचा संगम हा भविष्यातील परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरणार असून, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या तरुणांसाठी ही सुवर्णसंधी असल्याचे या सोहळ्यात अधोरेखित झाले.

# इंधन टंचाईची 'अफवा'; पालोदमध्ये झुंबड!

## सिल्लोड-जळगाव महामार्गावर पेट्रोलसाठी रांगा; पुरवठा सुरळीत, तरीही घबराट

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर**/सिल्लोड: देशात इंधन टंचाई निर्माण होणार असल्याच्या निराधार अफवा सध्या सोशल मीडियाच्या विविध माध्यमांतून व्हायरल होत आहेत. या अफवांना बळी पडून सिल्लोड तालुक्यातील पालोदसह परिसरातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र गुरुवारी पाहायला मिळाले. सिल्लोड-जळगाव या राष्ट्रीय महामार्गावरील 'विनोद पेट्रोलियम'वर सकाळपासूनच दुचाकी व चारचाकी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

पेट्रोलियम मंत्रालय आणि तेल कंपन्यांच्या तांत्रिक माहितीनुसार, देशातील इंधन डेपो आणि टर्मिनलवर पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. जागतिक घडामोडींचा दाखला देऊन पुरवठा खंडित होणार असल्याचा चुकीचा दावा काही मेसेजेसमध्ये केला जात आहे. मात्र, सध्या पुरवठा साखळीमध्ये कोणताही



तांत्रिक अडथळा आलेला नाही. केवळ भीतीपोटी नागरिक वाहनांच्या टाक्या 'फुल्ल' करून घेण्यासाठी गर्दी करत आहेत, ज्यामुळे मागणी आणि पुरवठ्याचा तात्पुरता असमतोल निर्माण होऊन पंपांच्या नियोजनावर ताण येत आहे.

* अफवा विरुद्ध वास्तव *

सध्या आगामी काळात इंधन संपणार असून पुरवठा बंद होणार आहे, अशी अफवा पसरवली जात आहे. मात्र, वास्तव असे आहे की इंधनाचा साठा मुबलक असून 'अत्यावश्यक सेवा' म्हणून इंधन पुरवठा नियमित सुरू आहे. या भीतीपोटी होणाऱ्या अनावश्यक गर्दीमुळे केवळ महामार्गावरील वाहतुकीवर विनाकारण ताण येत आहे, असा परिणाम दिसून येत आहे.

प्रशासकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इंधनाचा साठा मुबलक असून नागरिकांनी कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नये. विनाकारण इंधनाचा साठा करणे किंवा अफवा पसरवणे हे सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा आणणारे ठरू शकते. त्यामुळे नागरिकांनी संयम राखून केवळ आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



**"सध्या सोशल मीडियावर पसरत असलेल्या इंधन टंचाईच्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही. आमच्या पेट्रोल पंपावर पेट्रोल आणि डिझेलचा साठा पूर्णपणे उपलब्ध असून पुरवठा नियमितपणे सुरू आहे. केवळ अफवांमुळे नागरिक धास्तावले आहेत, ज्यामुळे पंपावर आणि महामार्गावर गर्दी होत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सहकार्य करावे, जेणेकरून कोणाचीही गैरसोय होणार नाही."**

**— विनोद काटकर (संचालक, विनोद पेट्रोलियम, पालोद)**

# पेट्रोल आणि डिझेल संपणार अशी अफवा पसरताच पेट्रोल पंपावर गर्दी !!

## नागरिकांनी अफवाना बळी पडू नये प्रशासनाचे आवाहन !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी :** बुधवार ला अकोटात इंधन संपणार असल्याच्या अफवा पसरल्यामुळे पेट्रोलपंपावर भल्या मोठ्या रांगा लागल्य . अफवा पसरल्याने निर्माण झालेल्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाकडून निर्बंध लावण्यात आले आहे. नागरिकांना कॅन बाटल्या किंवा ड्रम मध्ये इंधन देण्यासाठी सक्त मनाई करण्यात आली आहे.तालुक्यात पेट्रोल, डिझेल, गॅससाठा मुबलक प्रमाणात असून त्याचे प्रशासनामार्फत काटेकोर नियंत्रण केले जात आहे, असा दावा प्रशासनामार्फत वारंवार केला जात आहे. बुधवारपासूनच शहरातील विविध पेट्रोल पंपावर लागलेल्या वाहनांच्या रांगा भविष्याची चिंता वाढविणाऱ्या दिसत आहेत. आकोट शहरातील काही पेट्रोल पंपावर बुधवारी स्टॉक नसल्याचे बोर्ड लागले असल्याने लोक संतप्त झाले . अनेकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. अकोटात पेट्रोल/डिझेल टंचाईच्या अफवांमुळे पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची प्रचंड गर्दी आणि लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत. तालुक्यात अनेक भागांत पेट्रोल संपणार या भीतीने लोकांनी गर्दी केली. प्रशासनाने पुरवठा सुरळीत असल्याचे सांगून अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.सोशल मीडियावर पेट्रोल-डिझेल संपणार असल्याची चुकीची माहिती



**कोणीही अफवांना बळी पडू नये ..!**

**सध्या अकोट तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात पेट्रोल आणि डिझेलचा भरपूर प्रमाणात साठा उपलब्ध आहे. सर्व पेट्रोलपंपावर नियमित इंधनाचा पुरवठा केला जात आहे.नागरिकांनी घाबरून जाऊन पेट्रोल पंपावर अनावश्यक गर्दी करू नये. नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे.**

**तहसीलदार आकोट**

पसरल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पेट्रोल पंपांवर वाहनांची मोठी गर्दी असून काही ठिकाणी पेट्रोल संपल्यामुळे रांगा लागल्या आहेत. प्रशासनाने साठा पुरेसा असल्याचा दावा केला असून घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. तालुक्यात परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पेट्रोलची विक्री मर्यादित करण्यात आली आहे. नागरिकांनी अफवांकडे दुर्लक्ष करून गरज असेल तितकेच इंधन भरण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे.

# घोसला विविध विकास सोसायटीच्या चेअरमनपदी सचिन पाटील,तर व्हाइस चेअरमन पदी शिवाजी चव्हाण

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील विविध विकास सोसायटीच्या चेअरमनपदी सचिन अरुण पाटील यांची, तर व्हाईस चेअरमनपदी शिवाजी चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली.ही निवड प्रक्रिया दिनांक २३ रोजी पार पडलेल्या विशेष सभेत संपन्न झाली.सहकार अधिकारी विलास घुगे आणि गटसचिव शिवाजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी माजी चेअरमन शरद फकिरा महाजन,राजेंद्र सांडू पाटील, कैलास नामदेव पाटील, गुणवंत



पाटील,सुभाष बावस्कर,यांच्यासह सोसायटीचे सर्व सदस्य उपस्थित होते.निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचे ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले.

# सणसर येथे रामनवमी उत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथे जय श्रीराम प्रतिष्ठानामार्फत रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. बुधवार,दि.२५ मार्च रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात तब्बल १०२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली असल्याची माहिती जय श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष बजरंग रायते यांनी दिली.

गुरुवारी हभप शांताराम गांगुर्डे (आळंदी) यांची कीर्तन सेवा तसेच डॉ.गणेश राजाराम रायते यांच्या मार्गदर्शनाखाली महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.रामनवमीचे धार्मिक महत्त्व चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस असून याच दिवशी प्रभु श्रीरामांचा जन्म झाला.भगवान विष्णूचा सातवा अवतार मानले गेलेले श्रीराम यांनी असुरी शक्तींचा संहार करून धर्माची पुनर्स्थापना केली.

चैत्र शुक्ल नवमी,कर्क राशी, पुनर्वसु नक्षत्रात माध्यान्हकाळी माता कौशल्येच्या पोटी श्रीरामांचा जन्म झाला आणि संपूर्ण सृष्टी आनंदित झाली. या पावन दिवशी सर्वत्र श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा केला जातो.रामनवमी उत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष बजरंग रायते,हभप सागर महाराज



गुप्ते,डॉ.गणेश रायते,अभिजित निंबाळकर,योगेश सावंत, योगेश गाडे,हभप सचिन भोईटे,महादेव टुले,माऊली नलवडे,अनिल गुप्ते, गणेश भोसले आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले

# यवतमाळच्या युवकांनी घेतली केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांची भेट ;दिल्लीत रंगला 'आंतरराज्य युवा आदान–प्रदान' कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड** : 'मेरा युवा भारत' उपक्रमांतर्गत दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय आंतरराज्य युवा आदान-प्रदान कार्यक्रमात यवतमाळच्या युवकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या दौऱ्यादरम्यान युवकांनी युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

दिनांक १९ ते २३ मार्च दरम्यान पार पडलेल्या या विशेष कार्यक्रमात महाराष्ट्रातील यवतमाळ, जालना, सोलापूर, वाशीम आणि हिंगोली या जिल्ह्यांतील एकूण ३७ युवकांची निवड करण्यात आली होती. युवकांना इतर राज्यांतील संस्कृती, खानपान आणि राहणीमानाचा परिचय व्हावा, हा या उपक्रमाचा .

मंत्र्यांशी विविध प्रश्नांवर चर्चा



दिल्ली भेटीदरम्यान यवतमाळ आणि सोलापूरच्या युवकांनी ना. रक्षाताई खडसे यांची भेट घेतली. यावेळी युवकांनी त्यांच्या विविध समस्या मांडून त्यावर ठोस उपाययोजना करण्याची विनंती केली. मंत्री महोदयांनी युवकांच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

पाच दिवसांत विविध उपक्रम

पाच दिवसांच्या या निवासी प्रशिक्षणात युवकांना विविध विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच दिल्लीतील ऐतिहासिक स्थळांची सहल घडवून आणण्यात आली. उत्तर दिल्लीचे जिल्हा युवा अधिकारी दिवाकर भाटी, आरजू सक्सेना आणि विकास कश्यप यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.यवतमाळच्या चमूने जिल्हा युवा अधिकारी सारंग मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमात सहभाग घेतला. याप्रसंगी राजू गायकवाड, सलमान खान, गणेश माळी, संकेत राठोड, रोशन गवई, रोहन राठोड, पूजा येरेकर, श्रद्धा पवार, सिद्धी चव्हाण, प्रांजल यांच्यासह अनेक युवक उपस्थित होते.

# सिल्लोडमध्ये इंधन मुबलक; अफवांवर विश्वास ठेवू नका!

## सपोनि रवींद्र ठाकरेंकडून पंपांची पाहणी; विनाकारण गर्दी न करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड** :-सिल्लोड शहर आणि संपूर्ण तालुक्यात पेट्रोल-डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याची चुकीची माहिती सोशल मीडियावरून प्रसारित झाल्याने गुरुवारी दिवसभर नागरिकांमध्ये चिंतेचे आणि गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले. या अफवेमुळे तालुक्यातील विविध पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र, प्रशासकीय यंत्रणेने या अफवांचे अधिकृतपणे खंडन केले असून , तालुक्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती दिली आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे यांनी तातडीने शहर आणि परिसरातील ग्रामीण भागातील विविध पेट्रोल पंपांना भेटी देऊन परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. केवळ अफवांमुळेच ही गर्दी होत असल्याचे स्पष्ट



करत त्यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले. "तालुक्यातील इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत असून नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये. अनावश्यक साठवणूक करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू नये, प्रशासनाला सहकार्य करावे," असे सपोनि ठाकरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील अनेक पेट्रोल पंपांवर शेती कामासाठी डिझेल घेण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी दिसून आली. मात्र, पुरवठा खंडित झालेला नसून साठा मुबलक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव आणि गैरप्रकार टाळण्यासाठी केवळ वाहनांमध्येच इंधन भरण्याचे निर्देश पंप चालकांना देण्यात आले असून, बाटल्या किंवा डब्यांमध्ये इंधन देण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, सोशल मीडियाच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती पसरवून सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या संशयितांचा शोध पोलिसांनी तांत्रिक पथकाच्या मदतीने सुरू केला आहे. अशा समाजकंटकांविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार (भारतीय न्याय संहिता व आयटी ॲक्ट) कठोर कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया राबवली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनातर्फे देण्यात आला आहे. सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून नागरिकांनी केवळ अधिकृत सूत्रांकडून आलेल्या माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देवणी शहरात देशी दारू दुकानावरून वाद तीव्र; दुसऱ्या दुकानाला विरोध तर स्थलांतराचा मुद्दा पुन्हा चर्चेत

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी/पांडुरंग कदम :** देवणीतील दारू धोरणावर दोन गट आमनेसामने; कायदेशीर प्रश्न उपस्थित देवणी शहरात देशी दारू दुकानाच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा वाद चिघळला असून, एका बाजूला नवीन दुकान सुरू करण्याची मागणी तर दुसऱ्या बाजूला दुसरे दुकान होऊ नये यासाठी विरोधकांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल झाले आहे.

***नगरपंचायत ठराव आणि शासन निर्णयावर प्रश्नचिन्ह***

सन सप्टेंबर 2023 मध्ये देवणी नगरपंचायतीने शहरातील मूळ वस्तीतील देशी दारू दुकान हटवण्याचा ठराव मंजूर करून तो लातूर जिल्हाधिकारी व संबंधित राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठविला होता.

मात्र, शासन स्तरावर या ठरावाची चौकशी करताना प्रभाग क्रमांक 4 मधील महिला नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांची मागणी करण्यात आली. त्यानंतर संबंधित ठराव कालबाह्य ठरवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. *लोकसंख्या वाढ; दुसऱ्या दुकानाची मागणी जोरात*

देवणी शहराची लोकसंख्या 2026 मध्ये 20,000 पेक्षा अधिक झाल्याचा अंदाज असून, 2021 मध्ये मतदार संख्या सुमारे 12,000 होती.

या पार्श्वभूमीवर काही नगरसेवक व नागरिकांनी शहरापासून सुमारे 1.5 किमी अंतरावर, आंबेगाव रोडवर वस्ती नसलेल्या ठिकाणी नवीन देशी दारू दुकान सुरू करण्याची मागणी केली आहे.

या मागणीसाठी 50 महिला व 20 पुरुष नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह महादेव मळभगे गटाने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देण्यात आले आहे.

*विरोधकांची भूमिका; "दुसरे दुकान नको*




दुसऱ्या गटाने मात्र स्पष्टपणे "दुसरे दुकान होऊ देणार नाही" अशी भूमिका बबन कांबळे अमर पाटील यांनी घेतली आहे.

विशेष म्हणजे, मूळ वस्तीतील सध्या सुरू असलेल्या दुकानाला समर्थन दिले जात असल्याचे दिसून येत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि शंका निर्माण झाली आहे.

***शाळा व व्यापाऱ्यांचा त्रास; स्थलांतराची मागणी***

सध्या बसस्थानकासमोर असलेल्या देशी दारूदुकानामुळे न्यू मिलियन पब्लिक स्कूल व्यापारी वर्ग स्थानिक नागरिक यांना त्रास होत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

याकडे दुर्लक्ष करण्यासाठीच दुसऱ्या दुकानाच्या विरोधाचा मुद्दा पुढे केला जात असल्याचा आरोप मळभगे गटाने केला आहे.महसूल व निकषांचा मुद्दा

नवीन दुकान समर्थक गट महादेव मळभगे. दीपक स्वामी. शिवा कांबळे . यांचे म्हणणे

शासनाला महसूल वाढेल

प्रस्तावित ठिकाणी कोणतीही वस्ती किंवा धार्मिक स्थळ नाही

सर्व नियम व निकष पूर्ण होतात

त्यामुळे नवीन दुकानास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. *राजकीय व प्रशासकीय हस्तक्षेपाची चर्चा*

देवणी नगरपंचायतमध्ये सध्या काँग्रेसची सत्ता असल्याने नवीन दुकानासाठी एनओसी दिली जाईल का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.तसेच, सध्या चालू असलेल्या दुकानाच्या मालकाकडून शासकीय यंत्रणांवर प्रभाव टाकल्याच्या चर्चाही नागरिकांमध्ये रंगू लागल्या आहेत.

*नागरिकांमध्ये निर्माण झालेले प्रश्न*

मूळ वस्तीतील दुकान हटवण्याची मागणी आता का थांबली?दुसऱ्या दुकानाला विरोध का, पण सध्याच्या दुकानाला समर्थन का?प्रशासन कोणत्या निकषांवर अंतिम निर्णय घेणार देवणी शहरातील देशी दारू दुकानाचा प्रश्न हा केवळ परवानगीचा नसून सामाजिक, कायदेशीर व राजकीय पातळीवर गुंतागुंतीचा बनला आहे.आता अंतिम निर्णय जिल्हाधिकारी व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून घेतला जाणार असून, त्याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## "महिला न्यायासाठी छत्रपती घराण्याचे नेतृत्व हवेच!" — राज्य महिला आयोगासाठी संयोगिताराजे छत्रपतींच्या नियुक्तीची महाराष्ट्रभर सणसणीत मागणी

### शिवव्याख्याते गोपाल भिसडे पाटील यांची ठाम भूमिका; स्त्रीशक्ती सक्षमीकरणासाठी सक्षम, संवेदनशील नेतृत्वाची गरज अधोरेखित

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशीम राज्यातील महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी सक्षम, निर्भय आणि संवेदनशील नेतृत्वाची गरज असताना, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा पदी संयोगिताराजे छत्रपती यांची नियुक्ती करावी, अशी जोरदार मागणी संपूर्ण महाराष्ट्रभरातून पुढे येत आहे. शिवव्याख्याते गोपाल भिसडे यांच्यासह शिवभक्तांनी ही मागणी ठामपणे मांडली आहे.



छत्रपती शिवरायांचे थेट वंशज संभाजीराजे छत्रपती यांच्या धर्मपत्नी असलेल्या संयोगिताराजे या महिलांच्या न्यायासाठी प्रभावीपणे उभ्या राहू शकतात, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. अठरा पगड बारा बलुतेदार समाजातील महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचे नेतृत्व राज्यासाठी भूषणावह ठरेल, असे मत व्यक्त होत आहे.

राजमाता जिजाबाई, ताराराणी, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले आणि रामाबाई आंबेडकर यांच्या स्त्रीशक्ती, दूरदृष्टी आणि सामाजिक कार्याचा वारसा संयोगिताराजे यांच्या कार्यातून स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या

> **"महाराष्ट्रातील महिलांना न्याय देण्यासाठी सक्षम आणि संवेदनशील नेतृत्वाची गरज आहे. छत्रपती घराण्याच्या संस्कारातून घडलेल्या संयोगिताराजे छत्रपती या निश्चितच या जबाबदारीला न्याय देऊ शकतात. त्यांच्या नियुक्तीमुळे महिला आयोग अधिक प्रभावी होईल."**
>
> **— गोपाल भिसडे पाटील**
> **युवा शिवव्याख्याते**

नेतृत्वात महिलांना केवळ प्रोत्साहनच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून संधी दिली जात असल्याचेही दिसते.

दरवर्षी दुर्गराज रायगड किल्ला येथे साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करून, महिलांना नेतृत्वाच्या भूमिका देण्याचा नवा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे. गड-दुर्ग संवर्धन, स्वच्छता अभियान आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढवून "स्त्री-पुरुष समानतेचा" संदेश त्यांनी कृतीतून दिला आहे.

कोल्हापूर या सांस्कृतिक नगरीत महालक्ष्मी मंदिर व राजवाडा परिसरात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरातील रणरागिनींना एकत्र आणून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचे उल्लेखनीय कामही त्यांनी केले आहे.

आज राज्यात महिलांवरील वाढते अत्याचार, अन्याय आणि असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर ठाम व निर्णयक्षम नेतृत्वाची आवश्यकता अधोरेखित होत आहे. अशा परिस्थितीत संयोगिताराजे छत्रपती यांच्यासारख्या सक्षम नेतृत्वाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संधी देणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पनवेल क्लबचा हॅपी स्कूल प्रोजेक्ट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पनवेल क्लबने पनवेल येथील गुरुलिंगेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या मराठी शाळेत आवश्यक सुविधा सुधारण्याच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाच्या उद्देशाने 'हॅपी स्कूल प्रोजेक्ट इनरव्हील क्लब गॅलेक्सी न्यू पनवेल क्लबने आयोजन केले.बहुतेक विद्यार्थी जवळच्या झोपडपट्ट्या आणि रेड-लाइट भागांमधून येतात,जिथे जागरूकता आणि पाठिंब्याच्या अभावामुळे शिक्षणाची संधी अनेकदा मर्यादित असते.हे लक्षात घेऊन,आमच्या उपक्रमाने त्यांच्यासाठी एक चांगले आणि अधिक प्रोत्साहन देणारे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करुन या प्रोजेक्टचे आयोजन केले गेले.

क्लबच्यावतीने मराठी शाळेत विद्यार्थ्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे यासाठी वॉटर प्युरिफायर,शिक्षणाला चालना देण्यासाठी ग्रंथालयातील पुस्तके आणि 'मेरी किताब'ची



१०० पुस्तके आणि वर्गात आरामदायक वातावरण निर्माण करण्यासाठी एक पंखा भेट दिला.

शालेय साहित्य व्यवस्थित ठेवण्यासाठी एक कपाट उपलब्ध करून देण्यात आले. जेवण बनवण्यास आणि स्वच्छतेस मदत करण्यासाठी १०-लिटरच्या कुकरसोबत ताट,चमचे आणि ग्लास भेट दिले.त्याचवेळी विद्यार्थ्यांना फ्रुटीचेही वाटप करण्यात आले.यावेळी क्लबच्या प्रेसिडेंट भूमिका परमार,सेक्रेटरी दिपा आडमुठे,आणि इतर मेंबर उपस्थित होते.

## भानपूर जिल्हा परिषद शाळेत 'माजी विद्यार्थी व बाल आनंद मेळाव्याचे' उत्साहात आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी**

: : शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि गावातील शाळेच्या सर्वांगीण विकासावर चर्चा करण्यासाठी भानपूर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळेत भव्य 'माजी विद्यार्थी व बाल आनंद मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले.

**शाळेच्या आठवणी आणि विकासाचा ध्यास**

आपल्या गावाच्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, जुन्या मित्र-मैत्रिणींशी संवाद साधणे आणि शाळेच्या भविष्यातील प्रगतीसाठी योगदान देणे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. आज बुधवार, २५ मार्च रोजी सकाळी ११:०० वाजता शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण:

पुनर्मिलन: अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

चर्चासत्र: शाळेचा विकास कसा साधता येईल आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा कशा पुरवता येतील, यावर उपस्थित मान्यवरांनी



सविस्तर चर्चा केली.

बाल आनंद मेळावा: शालेय विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. "तुमच्या उपस्थितीने हा दिवस अधिक आनंदमयी झाला आहे," अशा शब्दांत आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले.

## डॉ. सचिन साबळे यांना 'राज्य व्यसनमुक्ती सेवा' पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात गेल्या २४ वर्षांपासून सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे सिल्लोड येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. सचिन विष्णुपंत साबळे यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठित 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. मुंबई येथे गुरुवारी आयोजित एका विशेष सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना या सन्मानाने गौरविण्यात आले.

महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२१-२२ च्या या पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, राजवस्त्र आणि १५ हजार रुपयांचा धनादेश असे आहे.



मुंबईतील या दिमाखदार सोहळ्यास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, ख्यातनाम सप्तखंजीर वादक सत्यपाल महाराज यांसह प्रशासकीय अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सचिन साबळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे युवा मंच, कै. विष्णुपंत साबळे प्रतिष्ठान, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे ग्रंथालय आणि दलितमित्र गयाबाई साबळे प्रतिष्ठानच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा मोठा जागर मांडला आहे . मागील २४ वर्षांपासून त्यांनी विविध पोस्टर प्रदर्शने, गुटखा-सिगारेट-तंबाखूची सार्वजनिक होळी, आरोग्य शिबिरे आणि व्याख्यानांच्या माध्यमातून तरुण पिढीला व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. त्यांच्या याच सामाजिक बांधिलकीची आणि निस्पृह सेवेची दखल घेऊन राज्य सरकारने त्यांची या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड केली.

या सन्मानाबद्दल सिल्लोड परिसरातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. सचिन साबळे यांचे अभिनंदन केले आहे. "हा पुरस्कार माझ्या कार्याची जबाबदारी वाढवणारा असून, व्यसनमुक्त समाजाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे," अशी भावना डॉ. साबळे यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली.

## प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (RTO) नियमांचे उल्लंघन करून वाहनांना देण्यात आले फिटनेस सर्टिफिकेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) : राज्यातील** काही प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (RTO) नियमांचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणावर वाहनांना फिटनेस सर्टिफिकेट देण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात मोटार वाहन निरीक्षक यांनी परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे.

मोटार वेहिकल ऍक्ट 1988 च्या कलम 56 तसेच केंद्रीय मोटर वाहन नियम (CMVR) मधील नियम 62 यांचे उल्लंघन करून Form 38A चा गैरवापर करण्यात आला आहे. नियमानुसार Form 38A हा तात्पुरता दस्तऐवज असून तो 15 दिवसांच्या आत संबंधित मूळ RTO कार्यालयात सादर करणे आवश्यक असते. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये ही मुदत संपल्यानंतरही तो स्वीकारण्यात आला. यापुढे कोणतीही नव्याने तपासणी न करता थेट अंतिम Form 38 जारी करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. काही प्रकरणांमध्ये शुल्क व प्रक्रिया देखील नियमबाह्य पद्धतीने पूर्ण करण्यात आल्याचा आरोप आहे. हा प्रकार शेकडो वाहनांमध्ये संगठित पद्धतीने झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या गैरप्रकारामुळे अपात्र (un-fit) वाहनांनाही फिटनेस सर्टिफिकेट मिळण्याची शक्यता असून, त्यामुळे रस्ते सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. तसेच शासनाच्या महसुलाचे नुकसान झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. *गंभीर बाब अशी की सदरील प्रकार हा विभागातील अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केला जात आहे की जे अधिकारी वरिष्ठ कार्यालयाच्या समोर आणि सामान्य नागरिकांनाच्या समोर केवळ कागदोपत्री दिखावा करतात. तक्रारीत संबंधित अधिकाऱ्यांवर अधिकाराचा दुरुपयोग, कर्तव्यात कसूर आणि जाणूनबुजून नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला असून भ्रष्टाचाराची शक्यता देखील नाकारता येत नसल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, संबंधित RTO अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, बेकायदेशीररित्या दिलेले सर्व फिटनेस सर्टिफिकेट रद्द किंवा पुनर्परीक्षण करण्यात यावे, दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, भ्रष्टाचार आढळल्यास प्रकरण ACB कडे वर्ग करण्यात यावे या मुख्य मागण्या आहे. या प्रकरणामुळे परिवहन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, राज्यभरात याबाबत सखोल चौकशीची गरज व्यक्त केली जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रीटघर येथे लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष शुभचिंतन समारंभ उत्साहात; विद्यालयासाठी ४० लाखांची मोठी घोषणा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष शुभचिंतन समारंभ' रीटघर येथे अत्यंत उत्साहात आणि भव्य दिव्य स्वरूपात संपन्न झाला. या सोहळ्याला संबोधित करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाची भव्यता आणि प्रेम पाहून जे काही काम मी आजवर करत आलो आहे, त्यापेक्षा दुपटीने काम करण्याची नवी स्फूर्ती मला मिळाली आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. तसेच कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे मनापासून आभार मानले. याच वेळी त्यांनी विद्यालयाच्या प्रगतीसाठी मोठी घोषणा करताना विद्यालयाचे सभामंडप बांधण्यासाठी आणि फरशी बसवण्यासाठी ४० लाख रुपये देण्यात येतील आणि गरज भासल्यास आणखीही आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाईल, असे जाहीर केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ जनरल बॉडी सदस्य भगत, वाय. टी. देशमुख, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, पंचायत समिती सदस्या वर्षा केवारे, माजी पंचायत समिती सदस्य राज



पाटील, रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी एम. के. कोंगरे, सरपंच सुभाष भोपी, उपसरपंच महेश पाटील, संस्थेचे सहाय्यक विभागीय अधिकारी व्ही. यू. जगताप, लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल कामोठेच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, विलास भोपी, बाळाराम भोपी, संजय पाटील, बळीराम भोपी, नवनाथ भोपी, वंदना भोपी, विष्णू भगत तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भारत भोपी, उपाध्यक्ष रमेश पाटील, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, विष्णू भगत, राजन भगत, गोपीनाथ भोपी, विश्वनाथ भोपी, नवनाथ भोपी, ग्रामपंचायत सदस्या कमळाबाई वाघमारे, नाना चौधरी, पोलीस पाटील दीपक पाटील यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. बी. कारंडे यांनी केलेल्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर नव्या जांभळे व रुद्र शेळके या विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली, तर माजी विद्यार्थी यशवंत उलवेकर आणि संजय पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारी प्रभावी भाषणे केली.

समारंभात विद्यालयातील सर्व महिला शिक्षिकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे औक्षण करून त्यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यालयामार्फत मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मानपत्र अर्पण करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृदय सत्कार केला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे व श्री भैरवदेव विद्यालय रिटघरच्या विद्यार्थ्यांनी रामशेठ ठाकूर यांचा जीवनपट नृत्यातून अत्यंत प्रभावीपणे सादर केला. या नृत्याचे दिग्दर्शन व नेपथ्य भोईर सर, खुटले मॅडम आणि गोंधळी मॅडम यांनी केले होते. या मंगल समयी वारकरी संप्रदायातील ७५ जणांना सन्मानपूर्वक भगवद्गीतेचे प्रदान करण्यात आले.

या सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी. बी. पाटील, जनरल बॉडी सदस्य व्ही. व्ही. पाटील, संजीवनी म्हात्रे, विविध शाखांमधील मुख्याध्यापक, वारकरी मंडळी, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गावंड मॅडम यांनी मानले.

# केकतसारणी येथे अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**(केज प्रतिनिधी-शरद गिराम ) :** केज तालुक्यातील केकतसारणी येथे समस्त गावकरी मंडळ व तरुण मंडळ यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह, शिवपुराण कथा सोहळा तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा गुरुवार दि. २६ मार्च २०२५ ते बुधवार दि. ०३एप्रिल २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

या सप्ताहात दररोज सकाळी काकड आरती, हरिनाम जप, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, भजन, कीर्तन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहातील कथा प्रवक्ते ह.भ.प. श्री. भालचंद्र महाराज देव




(केजकर) हे शिवपुराण कथेद्वारे भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. सप्ताहादरम्यान विविध नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार यांची उपस्थिती लाभणार आहे. त्यामध्ये ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज चवार, ह.भ.प. श्री. महादेव महाराज बोराडे शास्त्री , ह.भ.प. श्री. भागवताचार्य प्रमोद महाराज पवार , ह.भ.प. सौ. मुक्ताताई सोनवणे, ह.भ.प. सौ. प्रियंका ताई साखरे , ह.भ.प. कु. माधुरी ताई काळे, ह.भ.प. श्री. तुकाराम शास्त्री मुंडे, ह.भ.प. श्री. विनायक महाराज काचगुंडे, ह.भ.प. श्री.दीपक महाराज मेटे , ह.भ.प. श्री.दीपक महाराज बादाडे यांचे कीर्तन व प्रवचन होणार आहे.व कल्याचे कीर्तन, ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री यांचे होणार आहे.

तरी केकत सारणी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहचा अवश्य लाभ घ्यावा.

# मुंबईच्या महापौर सौ.रितू तावडे यांच्यासमवेत पर्जन्य जलनि:सारण(SWD) खात्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर** : लाड-पागे समिती शिफारसीनुसार पर्जन्य जलनि:निमार्ण(SWD) खात्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या एका पाल्याला मुंबई महापालिकेत नोकरी देण्यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी नुकताच मुंबई येथे महापौर सौ.रितू तावडे यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. महापौर रितू तावडे यांनी असे निदर्शनास आणून दिले कि,लाड-पागे समिती आयोग हा महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत येत आहे.तरीही आयुक्तांना मी पत्र देऊन लाड-पागे समिती शिफारसीनुसार धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबंधित अधिकाऱ्यांशी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी कामगारांसमवेत मिटींग घेऊन चर्चा करण्यात येईल असे आश्वासन महापौरांनी दिले.तसेच सातव्या आयोगानुसार कामगारांचे पे फीक्सेशन व्यवस्थित न झाल्याने सेवानिवृत्त कामगारांना ग्रॅज्युएटी व पेन्शन कमी प्रमाणात मिळालेली आहे,हा प्रश्नही महापौर समोर उपस्थित करण्यात



आला.यासंदर्भात खात्यांतर्गत अधिकारी व पेन्शन डीपार्टमेंटचे अधिकारी यांची स्वतंत्र बैठक लावून या विषयावर सविस्तर चर्चा करुन प्रश्न सोडविण्यात येईल असे महापौर सौ.रितु तावडे यांनी सांगितले. एकुणच महापौरांसमवेत व्यवस्थित, मुद्देसूद, सकारात्मक चर्चा झाली.याप्रसंगी बहुसंख्य सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर चौक येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रा./मोहम्मद पिंजारी :** मुरुड येथील शिवाजीनगर परिसरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त अहिल्यादेवी होळकर चौक येथे भव्य आणि भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा करण्यात आला. परिसरातील श्रीराम भक्तांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

या निमित्ताने प्रभू श्रीरामचंद्रांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. पूजेनंतर भक्तिमय वातावरणात श्रीरामांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील तसेच परिसरातील अनेक रामभक्तांनी



महाप्रसादाचा लाभ घेतला. रात्री उशिरापर्यंत महाप्रसाद सुरू असल्यामुळे मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमादरम्यान प्रभू श्रीरामांच्या जीवनावर आधारित भक्तिगीते साऊंड सिस्टीमद्वारे सादर करण्यात आली, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. शिस्तबद्ध नियोजन, आकर्षक सजावट आणि उत्साही वातावरणामुळे कार्यक्रम विशेष ठरला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजीनगर, मुरुड येथील तरुणांनी पुढाकार घेतला. रामेश्वर नाडे, विशाल सरवदे,ऋषिकेश बळवंत, आकाश सूर्यवंशी, आशिष फंड, सुजित नरवडे, आकाश घुले, ऋषिकेश झिरमिरे, विकास सूर्यवंशी, क्षितिज मेंकुदळे, राज बळवंत, अजिंक्य माळी, साई थोरात, रामा अंधारे, आकाश जोगदंड, बालाजी लांडगे, सुनील गायकवाड, अर्जुन साळुंके आदी रामभक्तांनी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला.एकूणच, श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने शिवाजीनगर परिसरात धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संदेश दिला.

# सणसर भीमजयंती समितीच्या अध्यक्षपदी दिपक चव्हाण तर सुनील लोंढे खजिनदार

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : सणसर (ता. इंदापूर) येथे भीमजयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच निवड करण्यात आली.ग्रामपंचायत सणसरचे माजी उपसरपंच आणि सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणारे मा.दिपक चव्हाण यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे तर खजिनदारपदी सुनिल लोंढे यांची निवड झाली आहे.

मा.दिपक चव्हाण यांनी उपसरपंच पदावर असताना गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले असून सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच सहभाग असतो.

त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेऊनच अध्यक्षपदाची जबाबदारी यावेळी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

या निवड प्रक्रियेस माजी अध्यक्ष शांताराम चव्हाण, खजिनदार विशाल चव्हाण,राजेंद्र महादेव चव्हाण, शरद मारुती चव्हाण,जगदीश चितारे,बापूराव चव्हाण,शरद चव्हाण, महेश चव्हाण, संजय चव्हाण, विदयासागर चव्हाण आदी कार्यकर्ते मोठया संख्येने लूंबिनी बुद्ध विहार सणसर येथे उपस्थित होते.

या निवडीमुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून भीमजयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी समिती सज्ज झाली आहे.

# आर्वी येथे केंद्रप्रमुख आणि पोलीस पाटलांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** तालुक्यातील आर्वी येथे श्री. भगवान नितळ केंद्रप्रमुख पदी, विशाल निवृत्ती आरेकर यांची आर्वी पोलीस पाटील पदी, प्रशांत तुपसौंदर यांची बावी गावच्या पोलीस पाटील पदी आणि राम अर्जुन माळी यांची शिरापूर गात येथील पोलीस पाटील पदी नियुक्ती झाल्याबद्दल डी. जी. मळेकर यांनी जाहीर केला. निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी केंद्र प्रमुख पदी निवड झालेल्या व पोलीस पाटील पदी निवड झालेल्या सर्व उमेदवाराने मनोगत व्यक्त केले व व शासनाची एकनिष्ठ राहून निसप्रहपणे सरकारी कामकाज करण्याचे आश्वासन दिले.श्री. डी. जी. मळेकर यांनी सर्व निवड झालेल्या उमेदवाराचे गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सरकारी कामकाज निष्ठेने करण्याचे व शासनाशी प्रामाणिकपणे राहण्याच्या



सूचनाही दिल्या. शिक्षणाशिवाय आता ग्रामीण भागामध्ये दुसरा सुद्धा कुठला उपाय राहिलेला नाही, त्यामुळे पालकांनी मुलाच्या शिक्षणाची काळजी घ्यावी व त्यांना उच्च शिक्षण व सुसंस्कृत करण्याचे प्रतिपादन केले.

याप्रसंगी गावातील डी. पी घरगीने सर, विष्णुपंत नितळ माजी सरपंच, बंडू फरताडे माजी सरपंच, शरद पवळ केंद्रप्रमुख कुर्ला, रावसाहेब जोगदंड, सुभाष मस्के, सोमनाथ देवकते, युवा नेते भरत घरगिने, बापू शिंदे, राम साळवे, अशोक सुसकर, पिंटू आरेकर, आयुब शेख, मुन्ना नागरगोजे यांच्यासह असंख्य लोक उपस्थित होते.

# सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ धनगर समाज रस्त्यावर! लिंबागणेश येथे रास्ता रोको

**दैनिक युवक आधार**

**शेख महेशर ताहेर, पाटोदा (प्रतिनिधी):-** धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर दि.१६ मार्चपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या दहाव्या दिवशी त्यांचे सासरे रामराव होळकर यांनी जालना येथील राहत्या घरी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.या घटनेनंतर धनगर समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून सरकारकडून केवळ आश्वासने देऊन वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप करण्यात आला. मंत्रीमंडळातील शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली असली तरी ठोस निर्णय न घेतल्याने समाजात नाराजी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२६ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे अहमदपूर–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन



करण्यात आले. आंदोलनाची सुरुवात स्व. रामराव होळकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. सरकारच्या हलगर्जीपणामुळेच त्यांचा बळी गेला असल्याची तीव्र भावना व्यक्त करण्यात आली. या वेळी डॉ.गणेश ढवळे, रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे पाटील, बाळासाहेब मुळे, शहादेव धलपे, कृष्णा पितळे आदींची समयोचित भाषणे झाली. विद्यार्थी गणेश ढगारे यांनी मनोगत व्यक्त केले.वक्त्यांनी सरकारने कोर्ट-कचेरी व समित्यांच्या प्रक्रियेत न अडकता धनगर आणि धनगड हे एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने घ्यावा, तसेच राज्यपालांच्या स्वाक्षरीसह शिफारस पत्र राष्ट्रपतींकडे पाठवून आरक्षणाचा मार्ग मोकळा करावा जयअशी मागणी केली. निवेदन पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, विठ्ठल राठोड, गणेश परझने सहाय्यक फौजदार लिंबागणेश पोलिस चौकी, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, शंकर वाणी, भगवान मोरे, गणपत तागड, बंकट लगास, भगवान मोरे, रामदास मुळे, गोवर्धन गिरे, ईश्वंभर मुळे, रोहित तागड, प्रविण मुळे, अर्जुन गिरे, रामकिसन गिरे, सुमंत मुळे, बंकट लगास, संदीप मुळे, बाबासाहेब गिरे, सतिश गिरे, केशव गिरे, श्रीराम तागड, आबा राहिंज, सुरेश निर्मळ, तुकाराम गायकवाड, गोरख मुळे, संजय पावले, रमेश गायकवाड, बापुराव पितळे, बंडु ढगारे, अमोल पितळे, हनुमंत वैद्य, अंकुश गिरे, लहु गिरे, लिंबाजी गिरे, श्रीहरी निर्मळ, परशुराम गायकवाड, अशोक जाधव, श्रीधर मुळीक, शहादेव कोल्हे, आप्पा मुळे, कल्याण कोकाटे, श्याम गिरे, सर्जेराव मुळे, रामचंद्र मुळे आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# कर्तव्यदक्ष महिला सन्मान सोहळ्यात सौ. साक्षी सागवेकर यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जागृतीज् फाऊंडेशन, नाशिक शाखा पनवेल यांच्या वतीने "कर्तव्यदक्ष महिला सन्मान" सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमामध्ये परिणिता फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याची विशेष दखल घेण्यात आली. समाजहितासाठी सातत्याने कार्य करत महिलांच्या सक्षमीकरणासाठी योगदान देणाऱ्या परिणिता फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. साक्षी सागवेकर यांना "कर्तव्यदक्ष महिला" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी गौरवोद्गार काढत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सौ. साक्षी सागवेकर यांनी विविध सामाजिक उपक्रमांद्वारे महिलांना मार्गदर्शन, मदत व प्रोत्साहन देण्याचे कार्य केले असून त्यांच्या या प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना आत्मविश्वास मिळून समाजात सकारात्मक बदल




घडत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. आशालता कांबळे; खेडमध्ये २९ मार्चला वैचारिक मेजवानी

**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी / प्रतिनिधी :** महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त आयोजित पहिल्या कोकण विभागीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक आणि आंबेडकरी चळवळीतील तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्या प्रा. आशालता कांबळे यांची निवड करण्यात आली असून, साहित्यविश्वात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी, स्वागताध्यक्ष ॲड. तु. ल. डफळे आणि मुख्य संयोजक अनिल येसोंडे यांनी संयुक्तपणे ही घोषणा केली. २९ मार्च २०२६ रोजी खेड येथील फुले-शाहू-आंबेडकर साहित्य नगरी, स्व. मीनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्र येथे हे संमेलन पार पडणार आहे.

प्रा. कांबळे यांच्या निवडीमुळे विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची परंपरा अधिक समृद्ध झाली आहे. यापूर्वी या मानाच्या यादीत बाबुराव बागुल, वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ अजिज नदाफ, आत्माराम राठोड, कॉ.तारा रेड्डी, तुलसी परब, डॉ. आ. ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ. श्रीराम गुंदेकर, विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ प्रतिभा अहिरे, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. अशोक राणा, डॉ. बी. जी. वाघ, लोकनाथ यशवंत, यांसारख्या दिग्गजांचा समावेश राहिला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कांदळगाव येथील प्रा. आशालता कांबळे या लेखिका, कवयित्री, संशोधिका, समीक्षिका, संपादिका आणि प्रभावी व्याख्यात्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी १४ हून अधिक पुस्तके लिहिली असून ४ पुस्तकांचे संपादन केले आहे. 'बहिणाबाईंची कविता : एक आकलन', 'सावित्रीबाई फुले साहित्य मीमांसा', 'आंबेडकरी आई' यांसारख्या संशोधनपर ग्रंथांबरोबरच 'रमाई एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व', 'आईची पत्रे' आणि 'दृष्टी' या नव्या पुस्तकांनी त्यांच्या साहित्यिक वाटचालीला नवे आयाम दिले आहेत. 'यशोधरेची लेक', 'लोकमाता अहिल्याबाई होळकर' आणि 'समर्थ स्त्रियांचा इतिहास' ही त्यांची विशेष गाजलेली पुस्तके आहेत.

गेल्या चार दशकांपासून त्यांनी हजारो प्रबोधनात्मक व्याख्याने देत समाज जागृतीचे कार्य सातत्याने केले आहे. राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले असून त्यांच्या साहित्याला अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'बहिणाबाईंची कविता : एक आकलन' या ग्रंथाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पुरस्कार तसेच 'प्रभाकर पाध्ये पुरस्कार' मिळाला आहे, तर 'आमची आई' या पुस्तकाला राष्ट्रीय स्तरावरील गौरव प्राप्त झाला आहे.

संमेलनात सकाळच्या सत्रात सांस्कृतिक विचार यात्रा, उद्घाटन समारंभ, पँथर ज.वि. पवार यांना प्रा. अंजलीताई आंबेडकर यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार, 'धर्म, संस्कृती, संविधान आणि मराठी साहित्य' या विषयावर परिसंवाद, कवी संमेलन आणि सायंकाळी समारोप असे विविध कार्यक्रम रंगणार आहेत.

संमेलनातील अध्यक्षीय भाषणातून प्रा.आशालता कांबळे विचारमंथन मांडणार असून, प्रा. प्रतिमा परदेशी यांचे उद्घाटनपर भाषण आणि प्रा. अंजलीताई आंबेडकर यांचे प्रमुख मार्गदर्शन हे संमेलनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र आणि कोकण बुद्ध धम्म संघ एज्युकेशन फाऊंडेशन, खेड यांच्या संयुक्त विद्यमाने होणारे हे संमेलन फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेला नवी ऊर्जा देणारे ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# "नवीन कायद्यांतर्गत महिला-बालकांवरील अत्याचारासह 18 गुन्ह्यांवर पोलीसांची कडक कारवाई; नागपूर पोलीसांची ठोस भूमिका"

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : नागपूर शहरातील महिला व बालकांवरील अत्याचार, तसेच समाजविघातक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नागपूर पोलीसांनी नवा कायदा लागू होताच कडक मोहीम सुरू केली आहे. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४ रश्मीता राव एन यांच्या आदेशानुसार भारतीय न्याय संहिता (BNS) व भारतीय नागरी सुरक्षा संहिता (BNSS) मधील बदलांनुसार 18 गंभीर प्रकारच्या गुन्ह्यांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत.

सन 2026 पासून अमलात आलेल्या या नव्या तरतुदींनुसार तडीपार, मोक्का, प्रतिबंधात्मक कारवाई आणि बालकांच्या संरक्षणाशी संबंधित गुन्ह्यांवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. पोलीसांनी तडीपार गुन्हेगारांविरुद्ध एकूण 10 प्रकरणांमध्ये कारवाई करत गुन्हेगारांना शहरातून हद्दपार केले.

> **नवीन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस खात्यांनी विशेष बैठका घेऊन अधिकारी–कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले आहे.शहरात गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी हा उपक्रम महत्वपूर्ण ठरेल, असा विश्वास पोलीसांनी व्यक्त केला आहे.**
>
> **— रश्मीता राव एन, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४, नागपूर शहर**

**कारवाईची आकडेवारी:**

तडीपार गुन्हेगारांवर कारवाई – 10 प्रकरणे

महिला व बालकांवरील एकूण 14 गुन्ह्यांवर विशेष पद्धतीने कारवाई

वाहन चोरी – 3

घरफोडी – 2

दुचाकी चोरी – 2

बालकांना लक्ष्य करून केलेले गुन्हे – 2

दंगा – 1 प्रकरण

नवीन कायद्यानुसार बालकांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून वाचवण्यासाठी BNSS कलम 95 अंतर्गत विशेष पाऊले उचलली गेली आहेत. गुन्हेगारांकडून बालकांचा गैरवापर, त्यांना गुन्ह्यात ढकलणे किंवा त्यांचा जबरदस्तीने वापर केल्यास कठोर शिक्षा व तत्काळ कारवाईची तरतूद आहे. त्यामुळे या तरतुदींनुसार बालकांना गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.तसेच, BNSS कलम 136(C) अंतर्गत तडीपार गुन्हेगाराने आदेशाचे उल्लंघन केल्यास कठोर दंडात्मक कारवाईची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामुळे गुन्हेगारांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे सोपे होणार असल्याचे पोलीसांनी स्पष्ट केले आहे.

# पवनी तालुक्यातील चिचाळ येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व समाधान शिबिर व नाविन्यपूर्ण उपक्रमाचे करण्यात आले होते आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे : भंडारा** -पवनी तालुक्यातील चिचाळ येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान व नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन 24 मार्च 2026 ला करण्यात आले होते .या शिबिरात भोगवटदार वर्ग दोन चे वर्ग एक मध्ये रूपांतर ,जिवंत सातबारा टप्पा एक, जिवंत सातबारा टप्पा दोन, सामाजिक अर्थसहाय्य योजना तुकडे बंदी कायदेविरुद्ध व्यवहार नियमानुकूल करणे, दाखले प्रमाणपत्र वितरण, सर्वांसाठी घरे पट्टे वाटप ,प्रलंबित फेरफार डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा व आठ अ वितरण, अधिकार अभिलेख




दुरुस्ती दाखले प्रमाणपत्र करिता अर्ज स्वीकारणे, ई मोजणी अर्ज स्वीकारणे तसेच मोजणी नकाशा पांदण रस्ते प्रशासकीय मान्यता आदेश वितरण ॲग्री टेक व पी एम किसान नोंदणी ,अकृषक आदेश निर्गमित प्रकरणात कजाप तयार करून गाव दप्तर अद्यावत करणे ,भूसंपादन प्रकरणात कजाप तयार करून गाव दप्तर अद्यावत करणे, त्याचप्रमाणे नवीन नावीन्यपूर्ण उपक्रम सदर शिबिरात राबविण्यात आले. यात प्रामुख्याने समर्पण ब्लड बँक भंडारा अंतर्गत 22 लोकांनी रक्तदान केले. 120 लोकांची नेत्र तपासणी, तीन प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वाटप ,एसटी विभागाचे स्मार्ट कार्ड वाटप संख्या ३३ ,आयुष्यमान कार्ड वाटप ३३, वयवंदना कार्ड १८, आबा कार्ड 3४ ,लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत १९ महिलांचे नाव सातबारावर सहधारक म्हणून दर्जा करून आदेश वाटप करण्यात आले. या शिबिरात एकूण ७८५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला.यावेळी प्रशांत पडघन उपजिल्हाधिकारी भंडारा, किशोर राऊत ,शुभदा धुर्वे नायब तहसीलदार, कापसे उपअधीक्षक भूमी अभिलेख, जी.बी अंबुले मंडल अधिकारी, सर्व तलाठी व कोतवाल चिचाळ मंडळ ,सरपंच चिचाळ पाथरी, सर्व विभागाचे कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका ,पोलीस पाटील ,तंटामुक्तीचे अध्यक्ष व विद्यार्थी महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मावलाई श्री राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार डॉ .गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना जाहीर ; पुरस्कार वितरण सोहळा बऱ्हाणपुर येथे ०३ एप्रिल रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार

**दैनिक युवक आधार**

**शेख महेशर ताहेर, पाटोदा (प्रतिनिधी) :** - गेवराई तालुक्यातील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा बऱ्हाणपुर यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १७ वर्षांपासून मावलाई देवी यात्रे निमित्त पत्रकारिता, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मावलाई श्री राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या वर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना मावलाई श्री समाजसेवा पुरस्कार-२०२६ जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न, वृक्षारोपण व संवर्धन तसेच पर्यावरण संरक्षण या सारख्या विविध सामाजिक विषयांवर सातत्याने अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून शासन दरबारी पाठपुरावा केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा बऱ्हाणपुर येथे दिनांक ०३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या वेळी शशिकांत शिंगारे यांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमोद कुलकर्णी, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, अविनाश वाघिरकर, धनंजय बजगुडे तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड आर.एम.मोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पाडळशिंगी ग्राम पंचायतचे सरपंच रितेश साबळे, मंडळ अध्यक्ष विष्णू यादव, सचिव भागवत वराट, पांडुरंग पवार, संतोष वराट यांनी केले आहे. दरम्यान, हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# महेंद्रशेठ घरत कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत मंगळवारी (ता. २४) कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या दर्शनासाठी गेले होते. यावेळी त्यांनी खणा-नारळाने ओटी भरून देवीची पूजा केली. चैत्र नवमीच्या पूर्वसंध्येला घेतलेले दर्शन विलोभनीय असल्याचे महेंद्रशेठ घरत म्हणाले. समाजातील दिनदुबळयांना मदत करण्याची मनोकामना पूर्ण करण्याचे बळ लाभू दे, अशी प्रार्थनाही त्यांनी महालक्ष्मीकडे केली. कोल्हापूरची महालक्ष्मी (अंबाबाई) हे महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी एक मुख्य शक्तिपीठ आहे. हे मंदिर प्राचीन करवीर निवासिनीचे आहे. स्थापत्यशैलीचे एक उत्तम उदाहरण म्हणून महालक्ष्मीच्या मंदिराची ख्याती आहे. महालक्ष्मीचे मंदिर हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते, त्यामुळे महेंद्रशेठ घरत दरवर्षी



कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक होतात आणि देवीची मनोभावे पूजा करतात.

# पनवेलच्या 'इतना सन्नाटा क्यू है भाई?' नाटकाला सलग चार पुरस्कार; राज्यस्तरीय नाट्यविश्वात दणदणीत यश

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते :** चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान प्रस्तुत २८ वा "सांस्कृतिक कलादर्पण २०२६" अंतर्गत आयोजित मराठी प्रायोगिक नाट्य महोत्सवात रायगड जिल्ह्यातून पनवेलच्या "इतना सन्नाटा क्यू है भाई?" या नाटकाने उल्लेखनीय कामगिरी करत सलग चार पुरस्कार पटकावले आहेत. या नाटकाची निर्मिती दीपक मिराणी यांनी केली असून, स्पर्धेतील पहिल्या सहामध्ये जिल्ह्यातून एकमेव नामांकन मिळवण्याबरोबरच या यशाने नाट्यवर्तुळात विशेष दखल घेतली आहे.

यापूर्वीही या नाटकाने महाराष्ट्र राज्य शासनाच्या हौशी नाट्य स्पर्धेत प्रथमच



सहभाग घेत तीन पुरस्कार मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली होती. या यशामागे लेखक व दिग्दर्शक संकेत गायकवाड, रिफ्लेक्शन थिएटरचे संस्थापक व व्यवस्थापक मृण्मय काणे, सोशल मीडिया मार्केटिंग हेड प्रसाद हनुमंते तसेच संपूर्ण टीमची मेहनत महत्त्वाची ठरली आहे. तसेच मिडिया पार्टनर म्हणून दैनिक युवक आधार यांचेही सहकार्य मोलाचे ठरले. त्यांच्या या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विशेष म्हणजे, रिफ्लेक्शन थिएटर या संस्थेला अल्पावधीतच मिळालेले हे यश उल्लेखनीय मानले जात आहे.

संस्कृतिक कलादर्पण गौरव रजनी पुरस्कार २०२६ अंतर्गत या नाटकाला "लक्षवेधी नाटक" म्हणून गौरविण्यात आले आहे. तसेच,

सर्वोत्कृष्ट अभिनेता : पंकज पुकळे

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : अनया पिंगळे

सर्वोत्कृष्ट नेपथ्य : सिद्धेश नांदलस्कर

अशा मानाच्या पुरस्कारांनी नाटकाच्या यशात आणखी भर घातली आहे.

दरम्यान, "सांस्कृतिक कलादर्पण गौरव रजनी पुरस्कार सोहळा" येत्या २८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता प्रभादेवी येथील रविंद्र नाट्य मंदिर येथे संपन्न होणार आहे. या राज्यस्तरीय प्रायोगिक नाट्य स्पर्धेसाठी श्रीनिवास नार्वेकर, प्रकाश जाधव, प्रभाकर सावंत आणि रमेश मोरे यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

# आढळगाव भागातील गुणवंतांना बळ; जनानंद फाउंडेशनतर्फे दरवर्षी बक्षीस वितरण होणार

**दैनिक युवक आधार**

**अहिल्यानगर प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती वाढावी आणि त्यांना दर्जेदार शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने जनानंद फाउंडेशनने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आढळगाव परिसरात राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक उपक्रमाचा विस्तार करत, आता दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान आणि बक्षीस वितरण करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

**महेंद्र शिंदे यांची महत्त्वपूर्ण घोषणा**

कार्यक्रमादरम्यान बोलताना महेंद्र रंजना उत्तम शिंदे यांनी या उपक्रमाला



अधिक व्यापक स्वरूप देण्याचा मानस व्यक्त केला. केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप करून न थांबता, विद्यार्थ्यांच्या कष्टाचे चीज व्हावे यासाठी दरवर्षी प्रत्येक इयत्तेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन त्यांच्या गुणवत्तेला नक्कीच चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गुणवत्तेचा होणार सन्मान

प्रत्येक इयत्तेचा विचार: इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या प्रत्येक वर्गातील पहिल्या तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना हे प्रोत्साहन दिले जाईल.

उद्देश: ग्रामीण भागातील मुलांनी शहरांतील विद्यार्थ्यांच्या तोडीस तोड प्रगती करावी आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवावा हा यामागचा मुख्य हेतू आहे.

व्याप्ती: आढळगाव परिसरासह शिवाजीनगर, पठाडे वस्ती, डोकेवाडी, काळाणे वस्ती आणि गव्हाणेवाडी यांसारख्या भागांतील

**शाळांमधील गुणवंतांना याचा लाभ मिळेल.**

या नवीन उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळणार आहे

# रॅप्सोडी 360: भारती विद्यापीठात सांस्कृतिक जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई (खारघर)** –Bharati Vidyapeeth Department of Management Studies यांच्या वतीने १४ ते १८ मार्च दरम्यान 'रॅप्सोडी 360' या वार्षिक सांस्कृतिक महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले. या महोत्सवाला ४६ विविध महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**पहिला दिवस (१४ मार्च):**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी उद्घाटन सोहळ्याने झाली. यानंतर "बिझनेस क्विझ" सारख्या व्यवस्थापनाशी संबंधित स्पर्धांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची परीक्षा घेतली. त्याचबरोबर "बुद्धिबळ, कॅरम, बॅडमिंटन" यांसारख्या इनडोअर स्पोर्ट्स आणि "क्रिकेट, व्हॉलीबॉल" यांसारख्या आउटडोअर स्पोर्ट्स स्पर्धा दिवसभर रंगल्या. दिवसाच्या शेवटी "वादविवाद" स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रभावी मते मांडत आपली वक्तृत्वकला सादर केली.

**दुसरा दिवस (१५ मार्च):**

दुसऱ्या दिवशी क्रीडा स्पर्धांना अधिक गती मिळाली. "ॲथलेटिक्स, कबड्डी, टग ऑफ वॉर आणि डॉजबॉल" यांसारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. "फुटबॉल" सामन्यांनी वातावरण अधिक रंगतदार केले. तसेच "डेडलिफ्ट" स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आपली शारीरिक ताकद सिद्ध केली.



**तिसरा दिवस (१६ मार्च):**

तिसऱ्या दिवशी सर्जनशीलता आणि आधुनिकतेचा संगम दिसून आला. ई-स्पोर्ट्स अंतर्गत "फ्री फायर" आणि "BGMI" या गेम्सनी तरुणांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला. "स्टम्बल गाइज" आणि HR "Crack the clue- ट्रेझर हंट" यांसारख्या उपक्रमांनी विद्यार्थ्यांमध्ये टीमवर्क आणि रणनीतीची भावना वाढवली. याच दिवशी "शार्क टँक" या व्यवस्थापन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपले व्यावसायिक आयडियाज सादर करत नवकल्पनांची झलक दाखवली.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रभावी मंच ठरला. विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य दाखवत आत्मविश्वास आणि अनुभवाची श्रीमंती मिळवली.

**चौथा दिवस (१७ मार्च):**

चौथ्या दिवशी "नृत्य, गायन, काव्य व शायरी" स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची रंगत वाढवण्यासाठी 'Agaz Band' यांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. तसेच Sayali Paradkar आणि Shilpa Rajpurohit या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

**पाचवा दिवस (१८ मार्च):**

पाचव्या दिवशी फॅशन शो, रॅम्प वॉक आणि 'फेस ऑफ रॅप्सोडी' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. "वॉर ऑफ डीजे" हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये विविध "डीजेनी" सहभाग घेतला."फॅशन शो" आणि "फेस ऑफ रॅप्सोडी" साठी Shreya Patil, Prabhat Koli आणि Ratnadeepti Shimpi यांनी प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून उपस्थिती दर्शवली

## वाढवण बंदर ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्प भूसंपादन मोबदला वाटपाला वेग

### भूधारकांसाठी विशेष कॅम्प, आर्थिक मार्गदर्शनावर भर - जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड

**पालघर :** वाढवण बंदर ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासाठी भूसंपादन मोबदला वाटप प्रक्रियेला सुरुवात झाली असून, भूधारकांना मोबदला सुलभ व पारदर्शक पद्धतीने मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक कार्यपद्धती आखली आहे. जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या संदर्भातील महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी महेश सागर, तेजस चव्हाण, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सहव्यवस्थापक संचित मंगला, विविध बँकांचे प्रतिनिधी तसेच पालघर व डहाणू तालुक्यातील अधिकारी सक्षम प्राधिकारी (CALA), बँकांचे अधिकारी, प्रकल्प क्षेत्रीय अधिकारी, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.

मोबदला थेट संबंधित भूधारकांच्या बँक खात्यात RTGS पद्धतीने जमा केला जाणार असून, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिले .भूधारकांनी अद्ययावत 7/12 उतारा, फेरफार नोंदी सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या प्रकरणांमध्ये वारस नोंदी प्रलंबित आहेत, त्या तातडीने पूर्ण करण्यासाठी ग्राम महसूल अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यासाठी तलाठी कार्यालये व ग्रामपंचायती येथे विशेष कॅम्प आयोजित करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले.



नोटीस बजावणीदरम्यान अनुपस्थित असलेल्या भूधारकांपर्यंत पुन्हा संपर्क साधण्याचे, आणि आवश्यकतेनुसार सार्वजनिक ठिकाणी नोटीस प्रसिद्ध करून पंचनामा करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिले.मोबदला मिळाल्यानंतर भूधारकांनी घाईघाईने खर्च न करता, तो सुरक्षित पर्यायांमध्ये गुंतवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी केले . नवीन जमीन खरेदी, बँक मुदत ठेवी (FD) किंवा पोस्ट ऑफिस बचत योजना यांसारख्या पर्यायांचा वापर करावा.याशिवाय, बँकांनी भूधारकांना नियमित उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करावे, तसेच मोठ्या रकमेच्या व्यवहारांवर मर्यादा ठेवून कुटुंबीयांची संमती घेण्याची प्रणाली विकसित करावी, असेही निर्देश जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिले. मोबदल्याच्या पार्श्वभूमीवर वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांचा धोका लक्षात घेता, OTP किंवा बँक तपशील कोणालाही देऊ नयेत, असे स्पष्ट करण्यात आले.

बँका व पोलीस विभागाने संयुक्तपणे जनजागृती मोहीम राबवण्याचेही निर्देश देण्यात आले.भूधारकांनी कोणत्याही मध्यस्थ, एजंट किंवा दलालांमार्फत व्यवहार न करता थेट सक्षम प्राधिकाऱ्यांशी किंवा तलाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी केले .

## दामू धादवड यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर !

**वासिंद :** जिल्हा परिषद शाळा ओहळाचीवाडी येथील वरिष्ठ शिक्षक दामू शंकर धादवड यांना ध्येय फाउंडेशन एज्युकेशनच्या वतीने 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. दामू धादवड हे गेल्या 33 वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांनी सहशिक्षक, पदवीधर शिक्षक, केंद्र प्रभारी मुख्याध्यापक म्हणून उत्तमरीत्या काम केले आहे. या अध्यापनाच्या कार्याबरोबरच त्यांनी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन क्षेत्रात शेकडो झाडांचे रक्षण करून, पक्षांसाठी अनेक उपक्रम राबवून पर्यावरण क्षेत्रात महत्वाचे काम केले आहे. या पुरस्कारासाठी शहापूर तालुक्यातून त्यांची निवड झाली



आहे.

धादवड यांना ध्येय फाउंडेशन एज्युकेशनच्या वतीने 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक 2025' पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून हा पुरस्कार वितरण कार्यक्रम 29 मार्च 026 रोजी, ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी, पिंपरी -चिंचवड मनपा, पुणे येथे होणार आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त खाद्यजत्रा उपक्रम

**कल्याण :** तुलसी लोक उद्यान हाऊसिंग सोसायटी, कल्याण येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तुलसी महिला मंडळा*तर्फे एक अनोखा व उत्साहवर्धक खाद्यजत्रा (स्टॉल्स) उपक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमामध्ये सोसायटीतील महिलांनी स्वतः घरी तयार केलेल्या विविध चविष्ट पदार्थांचे व आकर्षक वस्तूंचे स्टॉल्स लावले होते. खाद्यजत्रेत पुरणपोळी, भेळ, पावभाजी, मोमोज, ग्लास केक, दही वडा, चणा चाट, मठ्ठा, गुलाब सरबत, खाकरा, उलटा वडापाव, शेवपुरी, फ्रुट सलाड, दाबेली, सोलकडी, पापड, कुरडई, पेस्ट्री, विविध प्रकारचे केक, चॉकलेट व सरबते यांसारख्या रुचकर पदार्थांची रेलचेल पाहायला मिळाली. याशिवाय इमिटेशन ज्वेलरी चे स्टॉल्सही विशेष आकर्षण ठरले.



या कार्यक्रमाला सोसायटीतील रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्वांनी मनमुराद खरेदी करत महिलांच्या कौशल्याचे व मेहनतीचे कौतुक केले. वातावरणात आनंद, उत्साह आणि एकोपा दिसून येत होता. महिलांना आपल्या कला व उद्योजकतेला व्यासपीठ मिळाले, तसेच त्यांच्या आत्मविश्वासातही भर पडली.हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून समाजात महिला सशक्तीकरणाचा संदेश देणारा ठरला. अशा प्रकारचे उपक्रम भविष्यातही आयोजित करण्याचा संकल्प महिला मंडळाने व्यक्त केला.

## राजिप शाळा मांडवकर वाडी येथे निजामपूर केंद्र स्तरीय शिक्षण परिषद मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

**बोरघर :** बुधवार दिनांक २५ मार्च २०२६ रोजी निजामपूर केंद्राची शिक्षण परिषद मांडवकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. अध्यक्ष स्थानी केंद्रप्रमुख तथा विस्तार अधिकारी मा. श्री. संजय पालांडे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले ईशस्तवन व स्वागतगीत यामुळे वातावरण भारावून गेले. दरम्यान चव्हाण सरांनी दिलेल्या ढोलकीच्या सुरेल साथीनं कार्यक्रमाला अधिक रंगत आली. मुख्याध्यापिका सौ. मगर मॅडम यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. NEP सह बदलत्या सर्व शैक्षणिक धोरणासाह परिषदेत विविध शैक्षणिक व प्रशासकीय विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.


'निपुण महाराष्ट्र' या महत्त्वपूर्ण विषयावर सौ. शिवदे मॅडम यांनी मार्गदर्शन केले, तर 'नमुना पाठ' या विषयावर श्री. पोखरकर सर यांनी प्रभावी सादरीकरण केले. 'HPC' संदर्भात सौ. लीना मगर मॅडम यांनी माहिती दिली. तसेच इयत्ता चौथी शिष्यवृत्ती बाबत नम्रता बडे मॅडम व इयत्ता सातवी शिष्यवृत्तीबाबत मिनल पोखरकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले. 'कार्यानुभव' या विषयावर शिल्पा बांदल यांनी उपयुक्त माहिती मांडली.



या शिवाय उल्लास नवसाक्षर अभियान, विविध प्रशासकीय विषय, परिपत्रक वाचन, दाखलपात्र विद्यार्थी, आधार व अपार अपडेट यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर अध्यक्ष मा. पालांडे सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. ही परिषद शिक्षकांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.या परिषदेस निजामपूर केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. पोखरकर सर यांनी मांडवकरवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मगर मॅडम, सहशिक्षिका श्रीमती पाटील मॅडम तसेच उपस्थित सर्व शिक्षकांचे आभार मानले. अध्यक्षांच्या परवानगीने शिक्षण परिषद यशस्वीरित्या संपन्न झाल्याची घोषणा करण्यात आली.

## वन विभागाची 'सुवर्ण' कामगिरी

### वन संरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दलविभागीय वन अधिकारी गिरिजा देसाई, वनपाल सुरेश उपरे, रामदास खोत यांना सुवर्ण तर वनरक्षक अरविंद मांडवकरांना रजत पदक



विभागीय वन अधिकारी गिरिजा देसाई



वनपाल सुरेश उपरे



वनरक्षक अरविंद मांडवकर



वनपाल रामदास खोत

**रत्नागिरी :** वनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धनाचे प्रभावीपणे काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोधेर्ये वाढविण्यासाठी त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तरावरुन पदक बहाल करुन गौरविण्यात येते. विभागीय वन अधिकारी गिरिजा देसाई, वनपाल सुरेश उपरे, रामदास खोत यांना सन 2023-24 मधील उत्कृष्ट कामगिरीसाठी सुवर्ण पदक तर वनरक्षक अरविंद मांडवकर यांना रजत पदक जाहीर करण्यात आले आहे.महसूल व वन विभागाने काल 25 मार्च रोजी याबाबत शासन निर्णय प्रसिध्द केला आहे. श्रीमती देसाई ठाणे वन विभागात कार्यरत असताना 2023 अखेर त्यांनी 30 हून अधिक बिबट्यांची सुटका केली. जवळपास 200 हून अधिक अन्य वन्य प्राण्यांची सुटका केली आहे. अवैध तस्करी प्रकरणी 50 हून अधिक वाहने सरकारी जमा केली आहेत. पडघा येथील त्यांची खैर तस्करी कारवाई मोहीम विशेष गाजली. वन्य प्राणी विशेषत: बिबट्या या विषयी त्यांनी जनजागृती मोहीम राबविली आहे. या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत, त्यांना सुवर्ण पदक जाहीर केले आहे. त्याचबरोबर वनपाल सुरेश उपरे, रामदास खोत यांनाही त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन सुवर्ण जाहीर झाले आहे. तसेच वनरक्षक श्री. मांडवकर यांना रजत पदक राज्य शासनाने जाहीर केले आहे.

लवकरच राज्यस्तरीय पदक निवड समितीच्या शिफारशीनुसार या अधिकाऱ्यांना पदके देऊन गौरविण्यात येणार आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्र तलवाडा येथे HPV लसीकरण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी



**पालघर :** प्रा. आ. केंद्र तलवाडा येथे दि. २५ मार्च २०२६ रोजी HPV (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण कार्यक्रमाची नियोजनबद्ध व प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. सदर कार्यक्रमांतर्गत उपकेंद्र मेढी कार्यक्षेत्रातील पात्र मुलींची निवड करून त्यांना HPV लस देण्यात आली. कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान लाभार्थ्यांची नोंदणी, वैद्यकीय तपासणी, लसीकरणानंतर निरीक्षण तसेच आवश्यक ते आरोग्यविषयक मार्गदर्शन काटेकोरपणे पार पाडण्यात आले.

लसीकरण प्रक्रियेत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले असून लाभार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, एएनएम, आशा सेविका तसेच इतर आरोग्य कर्मचारी यांचे समन्वयित योगदान लाभले.तसेच, HPV लसीकरणाचे महत्त्व, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून होणारे संरक्षण, लवकर निदान व नियमित तपासणीची आवश्यकता याबाबत लाभार्थी व पालकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी डिजिटल साक्षरता महत्त्वाची – महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून महिलांचा उद्योग क्षेत्रात सहभाग

**मुंबई :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून अनेक महिलांनी बचतीतून लघुउद्योग सुरू केले आहेत. अशा अनेक महिलांना महिला विकास मंडळाच्या माध्यमातून दिले जाणारे प्रशिक्षण, अनुदान आणि भांडवल यामुळे महिलांना व्यवसाय उभारण्यासाठी तसेच, उत्पादने बाजारपेठेत पोहोचविण्यासाठीही मोठा आधार मिळत आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करताना त्यांना डिजिटल आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

महिला विकास मंडळाच्या सभागृहात लर्निंग लिंक्स फाउंडेशन आणि मास्टरकार्ड यांच्या सहकार्याने आयोजित भांडवल व अनुदान वितरण समारंभात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात महिला उद्योजकांना धनादेश, शिवणयंत्र तसेच घरगुती चक्की व्यवसाय सुरू करण्यासाठी साहित्य देण्यात आले. यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाचे रायगड जिल्ह्याचे जिल्हा समन्वय अधिकारी विजय ढोके, मास्टर कार्डचे उपाध्यक्ष हरीश बाबु एसएन, वरिष्ठ व्यवस्थापक सरत चंद्रन, लर्निंग लिंक फाउंडेशनचे ट्रस्टी ॲग्नी नाथन, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक अपूर्वा शिंदे यांच्यासह विविध संस्था, माविम आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील अनेक महिला ऑनलाईन व्यवहार करत असताना डिजिटल प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने त्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. त्यामुळे व्यवसाय सुरू करणाऱ्या महिलांना डिजिटल साक्षर करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

सिंधुदुर्ग, पुणे आणि रायगड जिल्ह्यांत सुरू असलेले हे कार्य राज्यभर विस्तारावे, जेणेकरून अधिकाधिक ग्रामीण महिलांना व्यवसायाच्या संधी मिळतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. महिला व बालविकास विभाग, महिला विकास मंडळ आणि सामाजिक संस्थांनी समन्वयाने काम करून हा लाभ अधिक महिलांपर्यंत पोहोचवावा, असेही त्या म्हणाल्या.




मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेतून मिळालेल्या रकमेची शिस्तबद्ध बचत करून अनेक महिलांनी स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारल्याची प्रेरणादायी उदाहरणे पुढे येत आहेत. पुण्यातील रिद्धी वाकणकर यांनी सुमारे सहा महिने रक्कम जमा करून सोप बेस, मुलतानी माती आणि डाळिंबाच्या सालीची पावडर यांसारखा कच्चा माल खरेदी केला. त्यातून त्यांनी घरगुती आयुर्वेदिक उत्पादनांचा व्यवसाय सुरू केला. आज त्या घरची जबाबदारी सांभाळत स्वतःचा लघुउद्योगही यशस्वीपणे चालवत आहेत. या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या जोरावर त्या आपल्या मुलीचे शिक्षण पूर्ण करत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, पुण्यातील भोसरी येथील स्नेहा कांबळे यांची कहाणीही तितकीच प्रेरणादायी आहे. ज्वेलरी बनवण्याची आवड आणि स्वतःचा उद्योग सुरू करण्याची इच्छा असूनही आर्थिक अडचणींमुळे त्यांना हे शक्य होत नव्हते. मात्र 'लाडकी बहीण' योजनेतून मिळणाऱ्या दरमहा दीड हजार रुपयांची बचत करून त्यांनी कच्चा माल खरेदी केला आणि हँडमेड ज्वेलरी तयार करण्यास सुरुवात केली. आज त्या विविध प्रदर्शनांमध्ये आपली उत्पादने विकत असून, हळूहळू त्यांचा व्यवसाय वाढत आहे. सध्या त्यांच्या कडे सुमारे ५० हजार रुपयांचा कच्चा माल असून प्रत्येक प्रदर्शनातून त्यांना ५ ते ७ हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.

याच पार्श्वभूमीवर आयोजित वार्षिक 'सशक्ती कॉन्क्लेव्ह २०२५-२६' मध्ये महिला उद्योजकांच्या यशाचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमातून महिलांना व्यवसायासाठी प्रोत्साहन, वित्तीय सुविधा आणि विविध शासकीय विभागांशी समन्वय साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. 'सशक्त महिला उद्योजकता कार्यक्रम हा पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतील कमी उत्पन्न गटातील महिला उद्योजकांना आर्थिक साक्षरता, डिजिटल साधने आणि व्यवसाय नियोजन कौशल्य देण्यासाठी तयार करण्यात आलेला एक अनोखा उपक्रम आहे. लर्निंग लिंक्स फाउंडेशनद्वारे राबविण्यात येणारा आणि मास्टरकार्डच्या सहकार्याने चालणारा हा कार्यक्रम २०२२ पासून महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये पोहोचला आहे.

# निवासी मालमत्ता करावरील शास्ती / व्याजामध्ये 90 टक्के सूट योजनेस 31 मार्चपर्यंत मुदतवाढ

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांसाठी निवासी मालमत्ता करावरील शास्ती (दंड/व्याज) मध्ये 90 टक्के सूट देण्याच्या योजनेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून असून या योजनेस 31 मार्च 2026 पर्यंत मुदतवाढ देत असतानाच अनिवासी मालमत्ताधारकांनाही सूट देण्याचा निर्णय महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी घेतला आहे. तरी निवासी / अनिवासी मालमत्ताधारकांसाठीही या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे निवासी करदाते थकीत मालमत्ता कर, चालू वर्षाचा कर त्यांना आकारण्यात आलेल्या शास्तीच्या 10 टक्के अशी एकत्रित रक्कम महापालिकेकडे जमा करण्याची मुदत 25 मार्च 2026 पर्यंत ठेवण्यात आली होती, या योजनेस करदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या योजनेस 31 मार्चपर्यंत मुदतवाढ निर्णय महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी घेतला असून करदात्यांचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच अनिवासी मालमत्ताधारकांनाही ही योजना लागू केली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे निवासी / अनिवासी करदाते थकीत मालमत्ता कर, चालू वर्षाचा कर त्यांना आकारण्यात आलेल्या शास्तीच्या 10 टक्के अशी एकत्रित रक्कम महापालिकेकडे जमा करतील अशा निवासी / अनिवासी करदात्यांना त्यांच्या थकीत मालमत्ता करावर कराधान नियम 41 (1) अन्वये आकारण्यात आलेल्या शास्तीमध्ये 90 टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या करदात्यांनी या निर्णयापूर्वी त्यांचा निवासी / अनविासी मालमत्ता कर महापालिकेकडे जमा केला असेल, अशा करदात्यांना सदरची योजना लागू असणार आहे. या योजनेचा उद्देश नागरिकांना थकीत निवासी / अनिवासी मालमत्ता कर भरण्यास प्रोत्साहन देणे हा असल्याचे नमूद करीत महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी ही अंतिम संधी असल्याचे म्हटले आहे.

महापालिकेच्या प्रभाग समिती स्तरावरील सर्व संकलन केंद्रांवर कार्यालयीन दिवशी सकाळी 10.30 ते सायंकाळी 5.00 या वेळेत तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच शनिवार-रविवारी सकाळी 10.30 ते दुपारी 4.00 या वेळेत कर भरता येणार आहे. तसेच महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध असून Google Pay, PhonePe, Paytm आणि BHIM ॲपद्वारेही सुलभतेने कर जमा करु शकतील. करदात्यांना कराचे देयक पाहणे व कर भरणे सुलभ व्हावे यासाकरिता +912225331590 या WhatsApp, Chatbot ही प्रणाली ठाणे महापालिकेने कार्यान्वित केली असून, करदाते याद्वारे देखील सुलभतेने कर जमा करु शकतील. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांनी या संधीचा लाभ घेऊन थकीत मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केले आहे.

# 'शेतकरी महासन्मान निधी' योजनेच्या आठव्या हप्त्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण

**मुंबई :** नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत आठव्या हप्त्यापोटी एकूण ८९,७५,२९८ शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकूण १७९८.७८ कोटी रुपये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट लाभ हस्तांतरणाद्वारे वितरित करण्यात आले.

विधान भवन, मुंबई येथे 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेचा आठवा हप्ता वितरण समारंभ झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच



वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत आठव्या हप्त्यात जिल्हानिहाय रक्कम वितरित करण्यात आली असून, अहिल्यानगर ₹१०८.३० कोटी, अकोला ₹३६.७६ कोटी, अमरावती ₹५३.३४ कोटी, बीड ₹७२.७० कोटी, भंडारा ₹४१.६५ कोटी, बुलढाणा ₹६६.७४ कोटी, चंद्रपूर ₹४७.९५ कोटी, छत्रपती संभाजीनगर ₹६८.१८ कोटी, धाराशिव ₹४६.८५ कोटी, धुळे ₹३०.६३ कोटी, गडचिरोली ₹२८.५० कोटी, गोंदिया ₹४२.४५ कोटी, हिंगोली ₹३५.०० कोटी, जळगाव ₹७७.४० कोटी, जालना ₹५८.८२ कोटी, कोल्हापूर ₹९२.३३ कोटी, लातूर ₹५३.८७ कोटी, नागपूर ₹३३.८८ कोटी, नांदेड ₹७६.५० कोटी, नंदुरबार ₹२०.४७ कोटी, नाशिक ₹८३.८६ कोटी, पालघर ₹१९.९५ कोटी, परभणी ₹४९.७९ कोटी, पुणे ₹८५.२४ कोटी, रायगड ₹२२.७९ कोटी, रत्नागिरी ₹ ३१.२१ कोटी, सांगली ₹७५.४९ कोटी, सातारा ₹८७.०७ कोटी, सिंधुदुर्ग ₹२३.५३ कोटी, सोलापूर ₹९७.५२ कोटी, ठाणे ₹१४.१८ कोटी, वर्धा ₹२५.६० कोटी, वाशिम ₹३३.०५ कोटी आणि यवतमाळला ₹५७.१८ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.

'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेंतर्गत २४ मार्च २०२६ अखेर एक ते सात हप्त्यांमध्ये एकूण १३०१७.३० कोटी रुपये ९३.०८ लाख शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण द्वारे जमा करण्यात आले आहेत.

# कांदा उत्पादकांच्या मदतीसाठी सचिव स्तरीय समितीने उपाययोजना करावी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** दरवर्षी कांद्याचा प्रश्न राज्यात उपस्थित होत असतो. या प्रश्नावर कायम स्वरुपी तोडगा काढण्याची गरज आहे. सद्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करावी लागणार आहे. यासाठी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव आणि पणन विभागाचे सचिव यांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीने शेतकऱ्यांना तातडीने करता येणाऱ्या उपायोजना सुचवाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. कांदा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी यंत्रणांनी दीर्घकालीन पर्यायांची अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

कांदा प्रश्नी विधानभवनात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कांदा व्यापारामध्ये होत असलेले गैरप्रकार रोखणे आणि कांद्याचे निर्यात वाढवून कांद्याचे दर स्थिर ठेवणे आदी केंद्र सरकारशी निगडित विषयांबाबत केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत बैठक घेण्यात येईल. तसेच दीर्घकालीन उपाययोजनाबाबत चर्चा करण्यात येईल. कांद्याचे उत्पादन निश्चितच वाढले आहे. वाढत्या उत्पादनाला बाजारपेठ निर्माण करून देणे गरजेचे आहे.



शेतकऱ्यांकडून व्यापारी कांदा घेऊन हा व्यापारीच कांदा नाफेड किंवा अन्य यंत्रणांना विक्री करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून हे कायमस्वरूपी थांबविणे गरजेचे आहे. नाशिक, पुणे, अहिल्यानगर व सोलापूर या जास्त कांदा उत्पादक जिल्ह्यांमध्ये 'क्रॉप डायव्हर्सिफिकेशन' करता येईल का याबाबतही समितीने पडताळणी करावी. येणाऱ्या खरीप हंगामातच हा प्रयोग करण्यात यावा. कांद्यामध्ये पण 'क्रॉप डायव्हर्सिफिकेशन' करणे गरजेचे आहे. यामध्ये वाणांची निवड, होणारे उत्पादन आदी बाबी निश्चितच तपासल्या पाहिजेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.शेतकऱ्यांना कांदा पिकाला जास्त उत्पन्न मिळवून देणाऱ्या पिकाकडे वळवावे लागेल. पुढील दोन ते तीन वर्षांमध्ये अशारीतीने कार्यपद्धती केल्यास कांद्याचे उत्पादन आणि पुरवठा हा शेतकऱ्यांना फायद्याचा होईल. सध्या कांद्याचे उत्पादन वाढवून शासनाला पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे शेतकऱ्यांना मदतही करावी लागते. यामध्ये शेतकऱ्याचे नुकसानच होते. या परिस्थितीतून शेतकऱ्यांना बाहेर काढायचे असल्यास दीर्घकालीन उपायोजना आवश्यक आहेत. या समितीने सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन अल्पकालीन उपायोजना सुचवाव्यात. तसेच पुढील दोन ते तीन महिन्यात दीर्घकालीन उपाययोजना निश्चित करून त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीला आमदार सर्वश्री सदाभाऊ खोत, दिलीप बनकर, राहुल आहेर, विक्रम पाचपुते, किशोर पाटील, शरद सोनवणे, राम भदाणे, काशिनाथ दाते, नितीन पवार, आशुतोष काळे, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, तसेच संबंधित यंत्रणांचे अधिकारी, कांदा निर्यातदार उपस्थित होते.